cmyk

## संपादकीय

### विश्वासाला तडा गेला ; बेफिकीरी कोणाची ?

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना या उपक्रमाच्या नावाखाली महाराष्ट्र राज्य सरकारच्या तिजोरीतून तब्बल ४ हजार ५२८ कोटी रुपयांची रक्कम विविध प्रकारचे घोटाळे करून हडपल्याचे प्राथमिक माहितीवरून स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्र्यांच्या महत्वाकांक्षी 'लाडकी बहिण' योजनेतून दहा टक्क्याहून अधिक म्हणजे तब्बल २६ लाख महिलांनी खोट्या माहितीच्या आधारे लाभ घेतल्याचे उघड झाले आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### माजलगाव धरणाला कोरड

माजलगांव-बीड आणि माजलगाव शहराची तहान भागवणाऱ्या माजलगाव धरणात १६.५ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्यावर्षी जुलै महिन्यात ८४ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. बीड जिल्ह्याला मोठ्या पावसाची प्रतीक्षा आहे. पाणीसाठा अत्यल्प असल्याने लवकरच बीड जिल्ह्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. माजलगाव धरण हे बीड आणि माजलगाव शहरासह परिसराची तहान भागवणारे मुख्य धरण आहे.

बीड - महाराष्ट्र वर्ष-५ अंक-९५ बुधवार, दि.३० जुलै २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने-६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### राज्यात लोकशाही नाही-अंजली दमानिया

मुंबई-माणिकराव कोकाटेचा राजीनामा आज झाला नाही यावरून काय कळतंय की लोकशाही नाही. यांच्यात मुख्यमंत्र्यांच्या म्हणण्याला काही किंमत नाही, उपमुख्यमंत्री त्यांच्यात पक्षातल्या लोकांवर कारवाई करू शकत नाहीत, असे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी म्हटले आहे.

### अतिरेकी मारले याचा विरोधकांना आनंद नाही-शाह

नवी दिल्ली-अतिरेक्यांकडे असलेल्या रायफलची चंदीगडमध्ये तपासणी केली. त्याच रायफल्समधून पहलगाममध्ये गोळीबार करण्यात आला होता. अतिरेक्यांच्या आकांना यमसदनी धाडले, अतिरेकी मारले याचा विरोधकांना आनंद नाही, असे अमित शाह संसदेत बोलताना म्हणाले.

### रेव्ह पार्टीवरच एकनाथ खडसेंचा संशय

जळगाव-अंमली पदार्थ मुलींच्या पर्समध्ये सापडतात. नाचगाण्याचा कार्यक्रम नाही, लेझर नाही. मग ही रेव्ही पार्टी कशी म्हणता असा सवाल एकनाथ खडसे यांनी केला. हा सर्व एकनाथ खडसे यांना दाबून टाकण्याचा प्रयत्न आहे.

### ठाकरे बंधूंची पुन्हा एकदा भेट होणार?

मुंबई : राज ठाकरेंनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरेंना शुभेच्छा दिल्या होत्या. २२ दिवसात ठाकरे बंधू दोन वेळा एकत्र आले. आता गणेशोत्सवात तिसऱ्यांदा ठाकरे बंधूंच्या भेटीचा योग जुळून येणार अशी चर्चा रंगली आहे.

# प्रतिक्षा संपली; पीएम किसानचा हप्ता ८ दिवसात मिळणार

## पैसे येण्यास विलंब होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा २० व्या हप्त्याच्या वितरणाला विलंब झाला असला तरी अखेर हप्ता वितरणास मुहुर्त मिळाला आहे. वितरणास विलंब होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये पीएम किसानबद्दल संभ्रम निर्माण झालेला आहे. परंतु आता मात्र २ ऑगस्ट रोजी पीएम किसानचा हप्ता वितरीत करण्यात येईल, अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची प्रतिक्षा आता संपणार आहे.**

गेल्या दिड महिन्यापासून पीएम किसान योजनेच्या २० व्या हप्त्याचे वितरण रखडले असून शेतकऱ्यांमध्ये त्यावरुन संभ्रम निर्माण झाला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी २ ऑगस्ट रोजी वाराणसीच्या दौऱ्यावर जाणार आहेत. याच दौऱ्यादरम्यान पंतप्रधानांच्या पीएम किसानच्या २० व्या हप्त्याचे वितरण शक्य असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पीएम किसान योजनेच्या पात्र शेतकऱ्यांना अखेर दिलासा मिळणार आहे.

### "२० व्या हप्त्यासाठी हे काम करावे लागणार

राज्य सरकारने कृषी विभागाच्या सर्व योजनांसाठी १५ एप्रिलपासून ॲग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत तयार करण्यात आलेला शेतकरी ओळख क्रमांक बंधनकारक केला आहे. परंतु पीएम किसानच्या २० व्या हप्त्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक बंधनकारक नसेल, अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे शेतकरी ओळख क्रमांक नसलेल्या शेतकऱ्यांनाही योजनेच्या २० व्या हप्त्याचा लाभ मिळणार आहे.

## २६ लाख लाडक्या बहिणी अपात्र नाहीत-आदिती तटकरे

**मुंबई । प्रतिनिधी**



२६ लाख लाडक्या बहिणी अपात्र झाल्या यात तथ्य नसल्याची माहिती महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरेंनी दिली आहे. आलेला डाटा हा मोघम असून त्याची पडताळणी करण्याचे काम सुरू आहे. पडताळणी झाल्यानंतर ▶▶ पान २ वर

### "९५०० कर्मचारी लाडकीच्या लाभार्थी?

१४ हजारांवर पुरुषांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याची बातमी ताजी असतानाच आता ९,५२६ राज्य सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ उचलल्याची माहिती आहे. तसेच अनेक सेवानिवृत्त महिला कर्मचाऱ्यांच्या खात्यातही लाडकी बहीणचे पंधराशे रुपयेही जमा होत असल्याचे समजते. तसेच ६५ वर्षे वयावरील १३ हजार ४६१ महिलांनी दुहेरी योजनेचा लाभ घेतल्याचे समजते. या महिलांना इंदिरा गांधी पेन्शन योजनेचा आधीच लाभ मिळत होता. सोबतच आता त्यांनी लाडकी बहीण योजनेचाही लाभ घेतल्याचे समोर आले आहे.

## एसआयटी नेमून वाल्मिक कराडच्या संपत्तीची चौकशी करा-आ.रोहित पवार

**परळी वै.। प्रतिनिधी**

**वाल्मिक कराडची एक हजार कोटींची संपत्ती जप्त करून एस आयटी नेमून संपत्तीची चौकशी करा अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे. ते येथील व्यापारी महादेव मुंडे यांच्या कुटूंबीयानी भेट घेऊन माध्यमांशी बोलत होते.महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांच्या मागणीनुसार संतोष साबळे व पंकज कुमावत यांचा एसआयटी मध्ये समावेश करा अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.**



आ.रोहित पवार,आमदार संदिप क्षीरसागर,राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के,राजेसाहेब देशमुख, राजाभाऊ फड यांनी मंगळवारी (दि.२९) सायंकाळी पाचच्या सुमारास महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली व महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणाची माहिती घेतली.यावेळी मेव्हणे सतिष फड व पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आमदार रोहित पवार यांना खून कसा झाला यामध्ये कोणा कोणाची ▶▶ पान २ वर

## कचऱ्याच्या ढिगाऱ्यापासून ५० फुटावर पालकमंत्री करणार वृक्षारोपण

**बीड । प्रतिनिधी**



ऐतिहासिक ठेवा असलेल्या दीप खंडोबा मंदिर या परिसरामध्ये नगरपालिकेने कचरा टाकून या भागात डंपिंग ग्राउंड केले की काय असा प्रश्न निर्माण होत असतानाच आता दीपमाळ परिसरापासून ५० फूट अंतरावर खंडेश्वरी परिसरामध्ये पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते वृक्षारोपण केले जाणार असल्याने सकाळपासूनच प्रशासन कामाला लागले होते परंतु आता हे कचऱ्याचे ढीग कधी हटवणार असाही प्रश्न बीड मधील नागरिकांनी इतिहास तज्ञ करत आहेत.

मंगळवार दिनांक २९ जुलै रोजी दैनिक राज्य लोक तंत्रणे ऐतिहासिक दीपमाळ परिसराला बीड ▶▶ पान २ वर

## एसटी पार्सलची जबाबदारी आता चालक-वाहकावर

### एसटी महामंडळाने घेतला निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**



एसटी महामंडळाच्या माध्यमातून पार्सल सेवा देण्यात येते, मात्र पार्सल गहाळ होण्याच्या तक्रारी आल्यानंतर एसटी महामंडळाने आता पार्सलची जबाबदारी चालक आणि वाहकावर सोपवण्यात आली आहे. महामंडळाच्या या निर्णयाला विरोध होण्याची शक्यता आहे.

पार्सल सेवा ही राज्यात खासगी व एसटी महामंडळाच्या माध्यमातूनही ▶▶ पान २ वर

## शाळेमध्ये घुसून गुंडगिरी करणारे आठजण बीड शहर पोलिसांनी पकडले

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील एका नामांकित शाळेमध्ये घुसून विद्यार्थ्याला त्यांच्या पालकाला मारहाण करून दहशत निर्माण करणाऱ्या शहरातील पाथरूड गल्ली भागात राहणारे तिघासह आठजणास बीड शहर पोलिसांनी पकडून चांगलाच सोप दिल्याची घटना घडली आहे या आठसह १५ जणावर बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दिनांक २३/०७/२०२५ रोजी सावरकर प्राथमिक विद्यालयाच्या आवारात शाळेतील दोन मुलांच्या एकमेकांमधील ▶▶ पान २ वर

## वादग्रस्त मंत्र्यांचे राजीनामे नाहीच; सर्वांनाच अभय!

### कॅबिनेट बैठकीत देवेंद्र फडणवीसांकडून फक्त सक्त ताकीद



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या कॅबिनेट बैठकीत मंगळवारी ८ महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. मात्र, या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोस्ट कॅबिनेट घेत मंत्र्यांची कानउघडणी केली असून सक्त ताकीद देण्यात आली आहे. त्यामुळे तुर्तास तरी वाचाळवीर आणि वादग्रस्त ठरलेल्या चारही मंत्र्यांचे राजीनामे घेऊन जनतेत चांगला संदेश देण्याऐवजी फडणवीस सरकारकडून त्या चारही मंत्र्यांना अभय दिला असल्याचे दिसून येत आहे.

गेल्या काही महिन्यापासून फडणवीस सरकारमधील चार ते पाच मंत्री वादग्रस्त ठरले आहेत. त्यामुळे त्यांचे राजीनामे घ्यावेत यासाठी विरोधकांकडून दबाव आणण्यात येत आहे. त्यामुळे मंगळवारी झालेल्या कॅबिनेट बैठकीच्या पुर्वी तरी त्या चार मंत्र्यांचे राजीनामे घेतले जातील, असे वाटत होते. ▶▶ पान २ वर

## मुंडे कुटुंबाच्या न्यायासाठी जरांगे यांच्या उपस्थितीत १ ऑगस्टला बैठक

**बीड । प्रतिनिधी**



परळी येथील व्यापारी महादेव मुंडे यांच्या क्रूर हत्येतील मारेकरी अजूनही सापडलेले नाहीत. महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांचा न्याय मिळवण्यासाठीचा लढा सुरूच असला तरी, अद्याप त्यांना न्याय मिळाला नाही. त्यामुळे आता त्यांच्या कुटुंबाला न्याय देण्यासाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि सकल मराठा समाज मैदानात उतरला आहे. यासाठी १ ऑगस्ट रोजी बीड शहरात महत्त्वपूर्ण बैठक बोलावली आहे.

महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी बीड जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात मोठे आंदोलन उभारले जाणार आहे. याचाच एक ▶▶ पान २ वर

## दहशतवाद्यांच्या पाकिस्तानी आकांना मातीत गाढले

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचे संसदेत स्पष्टीकरण; ९ मेला १ हजार मिसाईल्स, ड्रोनने हल्ला

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**या आधी पाकिस्तानमध्ये ज्या ठिकाणी कधीही सैन्य पोहोचले नव्हते त्या ठिकाणी हल्ले केले आणि दहशतवाद्यांना कंठस्नान घातले असे नरेंद्र मोदी म्हणाले. तसेच दहशदवाद्यांच्या पाकिस्तानी आकांना मातीत गाढण्याचे काम भारतीय सैन्याने केले असल्याचेही ते म्हणाले. तसेच ९ मे रोजी पाकिस्तानने १ हजार मिसाईल्स आणि ड्रोनद्वारे भारतावर हल्ला केला होता, मात्र आपल्या एअर डिफेन्स सिस्टमने तो हल्ला परतून लावला असल्याचे मोदी म्हणाले.**



पहलगाम हल्ल्यानंतर त्याचा बदला आम्ही घेतला, २२ एप्रिलच्या हल्ल्याचा बदला भारतीय सैन्याने २२ मिनिटात घेतला आणि दहशतवाद्यांना गाढले असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. भारतीय सैन्याने केलेल्या हल्ल्यामुळे त्यांना पोसणाऱ्या आकांची आजही झोप उडाली असून पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सिंधू पासून ते सिंधूरपर्यंत हल्ला करत पाकिस्तानला धडा शिकवला असे नरेंद्र मोदी म्हणाले.

पाकिस्तानच्या या मिसाईल्स आणि ड्रोन भारताच्या कोणत्याही भागात पडले असते तर मोठा विध्वंस झाला असता असेही मोदी यांनी सांगितले. भारताच्या एअर डिफेन्स सिस्टिमने पाकिस्तानच्या मिसाईल आणि ड्रोन्सना नेस्तनाबूत केले. मी आज एक आकडा सांगणार आहे. हा आकडा ▶▶ पान २ वर

### अखेर दया नायक यांना बढती

मुंबई-एन्काऊंटर स्पेशालिस्ट म्हणून प्रसिद्ध असलेले वरिष्ठ पोलीस अधिकारी दया नायक यांना अखेर सहायक पोलीस आयुक्त पदावर बढती मिळाली आहे. विशेष बाब म्हणजे ही बढती त्यांना निवृत्तीच्या अवघ्या दोन दिवस आधी मिळाली आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ जुलै २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८८.०० क्विंटल | २,०३० | २,८०१ | २,५९५ |
| ज्वारी/हायब्रिड: ९५.५० क्विंटल | १,९०० | २,८०० | २,३८६ |
| मका/लोकल:१२.५० क्विंटल | २,०२० | २,२८० | २,१५० |
| तूर : २२.०० क्विंटल | ६,००० | ६,५२४ | ६,२६२ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १०९.०० क्विंटल | २,०६० | २,८८४ | २,५८७ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: ३.५० क्विंटल | ४,४०० | ४,४०० | ४,४०० |
| हरभरा: २२.०० क्विंटल | ५,६६० | ६,६८० | ६,०१८ |

## मारहाण करून व्हिडीओ व्हायरल प्रकरणी बीडमध्ये चौघांवर गुन्हा

**बीड । प्रतिनिधी**

**हातात कोयते आणि सत्तुर घेऊन एका तरूणावर हल्ला करत त्याचा व्हिडीओ करून तो व्हायरल केल्याचा प्रकार घडला होता. या प्रकरणात चार जणांविरूद्ध पेठ बीड पोलीस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

शेख आसिफ शेख अनिस (वय२२) या तरूणाला धारदार शस्त्राने मारहाण केल्याची घटना तेलगाव रोड परिसरात घडली होती. यामध्ये तो गंभीर जखमी झाला होता. सदरील व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर काल रात्री उशिरा शेख आसिफ याच्या फिर्यादीवरून शहेबाज अब्बाज पठाण (रा.तेलगाव नाका,बीड),शेख आदिल शेख मुजीब(रा.मोमीनपुरा बीड), शेख नुमान वइतर एक अशा चौघांविरूद्ध कलम११८ (२), ११५(२), ३५१(२),३५२,३(५) बीएनएससह कलमआर्म ॲक्ट ४, २५ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. मारहाण करण्याचे व्हिडीओ गल्लीत का दाखवतोस अशी विचारणा केल्याच्या कारणावरून हा प्रकार घडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# संपादिका जान्हवी धनंजय मुंडे .....व्हाया सिटी मिरर अमेरिका



**बीड । प्रतिनिधी**

**राजकारणामध्ये धनंजय मुंडे बस नाम काफी है परंतु त्यांची कन्या तिच्या क्षेत्रात काकणभर पुढे आहे हे देखील कमी नाही व्हीसल्यानं युनिव्हर्सिटी यूएसए अमेरिकेमध्ये सरकार मानवी हक्क आणि जनतेचे प्रश्न या विषयांमध्ये पदवी घेत असताना तिच्यावर मोठी जबाबदारी सिटी मिरर या वृत्तसंस्थेच्या संपादक पदाची देण्यात आली आहे ही आनंदाची बाब खुद्द माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी एक्स वर पोस्ट करत दिली आहे.**







मराठी माणसाची विदेशात एखाद्या मुख्य पदावर आणि तेही समाज माध्यमाच्या क्षेत्रात प्रमुख होणे ही अभिमानाची आणि गौरवाची बाब आहे विशेष बाब म्हणजे राज्याचे माजी मंत्री राष्ट्रवादीचे तरुण नेते आमदार धनंजय मुंडे यांची ती कन्या आहे ती सध्या अमेरिकेमध्ये ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# विश्वासाला तडा गेला ; बेफिकिरी कोणाची?

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना या उपक्रमाच्या नावाखाली महाराष्ट्र राज्य सरकारच्या तिजोरीतून तब्बल ४ हजार ५२८ कोटी रुपयांची रक्कम विविध प्रकारचे घोटाळे करून हडपल्याचे प्राथमिक माहितीवरून स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्र्यांच्या महत्वाकांक्षी 'लाडकी बहिण' योजनेतून दहा टक्क्याहून अधिक म्हणजे तब्बल २६ लाख महिलांनी खोट्या माहितीच्या आधारे लाभ घेतल्याचे उघड झाले आहे. त्याहून दुर्दैव म्हणजे १४ हजारहून अधिक पुरुषांनी सुद्धा ही रक्कम लाटण्यात कसूर सोडलेली नाही. इतके दिवस पुरुष याचा लाभ घेत आहेत याची माहिती शासनाला अनेक प्रकारच्या चौकशीतूनही समजलेली नव्हती हे विशेष. राज्यात जेव्हा खूपच आर्थिक चणचण भासू लागली तेव्हा कुठे महिला व बालकल्याण विभागाने शासनाच्याच निर्देशांनंतर केलेल्या पडताळणीत ही धक्कादायक बाब पुढे आली आहे. यामुळे शासनाची विश्वासार्हता, सार्वजनिक पैशांच्या वापराचे नियोजन आणि प्रशासनावरचा जनतेचा विश्वास उडाला आहे. सरकारच्या विश्वासार्हतेला एका अर्थाने ग्रहणच लागले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या घोषणा आणि विधिमंडळात दिलेली आकडेवारी पाहता, लाडकी बहिण योजनेतील दोन कोटी ५२ लाख लाभार्थ्यांपैकी २६ लाख ३४ हजार जणी अपात्र ठरल्या आहेत. अपात्र असूनही त्यांना रोख रक्कम स्वरूपात प्रत्येक महिलेस १२ हजार रुपये दिले गेले. त्यामुळे सुमारे ३१५० कोटी रुपयांचा थेट गैरवापर झाला असून, त्यावरील प्रक्रिया खर्च धरून एकूण खर्च ४५२८ कोटींवर गेला आहे. या लाभार्थ्यांपैकी बऱ्याचशा महिला पात्रतेच्या निकषातच बसत नव्हत्या. वय, उत्पन्नाची मर्यादा, वैवाहिक स्थिती अशा अनेक मुद्यांवर त्यांची माहिती खोटी निघाली. ही सर्व बाब राज्याच्या यंत्रणेसमोर दिलेल्या आधार क्रमांक, बँक खात्यांची माहिती आणि प्राप्त माहितीच्या क्रॉस व्हेरिफिकेशननंतर उघड झाली. पण जेव्हा या योजनेचा लाभ दिला जात होता तेव्हा जिल्हास्तरावर होत असणाऱ्या पडताळणीतच ही नावे बाजूला होणे आवश्यक होते. मात्र निवडणुकीच्या कैफात बुडालेल्या राज्यकर्त्यांना मध्यप्रदेशच्या शिवराजसिंह सरकारचे यश खुणावत होते. या योजनेने संपूर्ण महाराष्ट्र आर्थिक अडचणीत आला आहे. ही जबाबदारी कोणाची? शासनाचे पैसे उडवले गेलेत, पण त्याबाबत उत्तरदायित्व निश्चित करण्याचे कोणतेही ठोस पाऊल अद्याप उचलले गेलेले नाही. साडेचार हजार कोटींची रक्कम कुठल्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे आणि अपयशामुळे खर्ची पडली? आणि महत्त्वाचे म्हणजे ही रक्कम वसूल कुणाकडून करायची? महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा प्रशासन, तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांपासून ते डेटा संकलन करणाऱ्या यंत्रणांपर्यंत कोणत्याही पातळीवर जबाबदारी स्वीकारली गेली नाही. योजना जाहीर करताना मुख्यमंत्री एकीकडे पारदर्शकतेचे ढोल बडवत होते, पण आता गोंधळ उघड झाल्यानंतर मात्र 'राजकीय शांतता' राखली जात आहे. महत्त्वाचे म्हणजे, महिला व बालकल्याण विभागाकडे अपात्र लाभार्थ्यांची यादी उपलब्ध असूनही, त्यांच्याकडून रक्कम वसूल करण्यासाठी कोणतीही कार्यवाही सुरू झालेली नाही. याचा अर्थ असा की, शासनाची भूमिका ही केवळ आकडे सादर करण्यापुरती मर्यादित राहिली आहे. ही कारवाई केवळ 'तपासासाठी तात्पुरती' आहे की खरंच कोणावर जबाबदारी निश्चित होणार आहे, याबाबत स्पष्टता नाही. योजना जाहीर करताना ज्यांनी यंत्रणा राबवली त्यामध्ये तालुका बालविकास अधिकारी, जिल्हाधिकारी, महिला बालकल्याण उपायुक्त, तसेच माहिती तंत्रज्ञान विभागातील अधिकारी यांचा स्पष्ट सहभाग आहे. मग यामधील दोषींवर सरकार कारवाई करणार की नाही? या योजनेत लाभार्थ्यांच्या निवडीसाठी जी माहिती वापरली गेली ती स्वत: प्रशासनानेच गोळा केलेली होती. यात जर अपात्र लाभार्थी घुसले असतील, तर याचा अर्थ किंवा ते मुद्दाम घुसवले गेले असा निष्कर्ष निघतो. त्यामुळे संबंधित अधिकारी हे निष्पाप आहेत, असे गृहित धरता येणार नाही. या गंभीर प्रकाराचा तपास हीतसंबंधित विभागाच्या आतून न होता, स्वतंत्र आणि सक्षम तपास यंत्रणेकडून व्हायला हवा. ही गोष्ट केवळ एका योजनेपुरती मर्यादित नाही, तर संपूर्ण सरकारी यंत्रणेच्या पारदर्शकतेवर आणि जनतेच्या पैशाच्या जबाबदार वापरावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा मुद्दा आहे. त्यामुळे हे प्रकरण महाराष्ट्र आर्थिक गुन्हे शाखा किंवा अंमलबजावणी संचालनालयाकडे (ईडी) दिले गेले पाहिजे. विशेषत: ज्या जिह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अपात्र लाभार्थी आढळून आले, तिथले अधिकारी, डेटा एंट्री एजन्सी, आणि लाभार्थी प्रमाणित करणाऱ्या समित्यांचे सदस्य हे कारवाईच्या कक्षेत यायला हवेत. यामुळेच इतर जिह्यांतील अधिकारी सतर्क राहतील आणि शासनाच्या योजना भविष्यात लोकांपर्यंत योग्य प्रकारे पोहोचतील.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बीड तालुकाध्यक्षपदी ॲड.राजेंद्र राऊत

## राष्ट्रीय प्रवक्ते, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते दिले नियुक्तीपत्र

बीड । प्रतिनिधी

**तालुक्यातील नाळवंडीचे सरपंच तथा जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ॲड.राजेंद्र राऊत यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बीड तालुकाध्यक्षपदी मंगळवारी (दि.२९) मुंबई येथे निवड करण्यात आली. त्याबद्दल पदाधिकारी, कार्यकर्त्यांमधून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.**



या निवडीची घोषणा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आ.अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांच्या सूचनेवरून करण्यात आली. मुंबईत छोटेखानी कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, प्रदेश सरचिटणीस माजी आ.अमरसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते ॲड.राजेंद्र राऊत यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी जिल्हा सरचिटणीस बाबासाहेब घुगे, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, माजी नगरसेवक बाळासाहेब गुंजाळ, प्रदीप गायकवाड यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने माझ्यावर टाकलेला विश्वास ही केवळ सन्मानाची बाब नाही, तर तालुक्यातील पक्षबांधणीसाठी अधिक जोमाने काम करण्याची जबाबदारी आहे, अशी भावना नवनियुक्त तालुकाध्यक्ष ॲड.राजेंद्र राऊत यांनी व्यक्त केली. पुढे ते म्हणाले, निवडीबद्दल सर्व पक्षश्रेष्ठी, जिल्ह्यातील नेत्यांचे मी आभार मानतो. माझ्यावर विश्वास दाखवला, तो मी नक्कीच सार्थ ठरवेन. ग्रामीण भागात पक्षाचे विचार व धोरणे पोहोचवणे, नव्या नेतृत्वाला पुढे आणणे, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणे हे माझे प्राधान्य असेल. जनतेच्या प्रश्नावर आवाज उठवणे व सर्वसामान्यांच्या मदतीसाठी सदैव पुढे राहणे, ही माझी कार्यपद्धती राहील, असेही ॲड.राजेंद्र राऊत यांनी स्पष्ट केले.

# साहित्यरत्न आण्णाभाऊ साठेंच्या लेखणीने मृत्यप्राय समाजाला जागृत केले- जयश्री विधाते

बीड । प्रतिनिधी

साहित्यरत्न डॉ. आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड ने आयोजीत केलेल्या गौरव महोत्सवात दि. २८ जुलै रोजी सायंकाळी आण्णाभाऊ साठे सभागृह मैदान चांदणेवाडा पेठ बीड येथे श्रीमती प्रेमलताताई चांदणे ज्येष्ठ मा. सभापती तथा नगरसेविका, नगर परिषद बीड. यांच्या माध्यमातून परिसरातील महीलांना कल्पतरूच्या सचिव डॉ. सारीकाताई क्षीरसागर यांच्या शुभहस्ते तर मा. सभापती तथा नगरसेविका जयश्रीताई विलास विधाते यांच्य प्रमुख उपस्थितीत साडी वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यारत्न आण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त आशोक सोनवणे, जयंती उत्सव समिती सचिव पोपट मिसाळ, सचिव सुनिल पाटोळे,



सुधाकर धुरंधरे, केशव लोंढे, प्रविण थोरात यांची उपस्थिती लाभली होती कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षा प्रेमलताताई चांदणे यांनी कार्यक्रमाचे उद्घाटक, प्रमुख पाहुणे आणि उपस्थितीतांचे स्वागत करत कार्यक्रमाची रुपरेषा मांडली. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी डॉ. सारीकाताई क्षीरसागर यांनी उपस्थित महिला भगीनींना संबोधित करत असताना दुखः दारिद्र्याशी झुंजत संसाराचा गाढा हाकत असताना जपलेला करारी बाण्या बद्दल महिला भगिनींच्या पाठीवर शब्बाशकीची थाप दिली. तर आपल्या शुभेच्छापर भाषणात जयश्रीताई विधाते यांनी स्मृतीशेष आत्माराम चांदणे यांनी दाखवून दिलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतील अतुलनीय योगदानाबद्दल डिपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य भैय्या चांदणे आणि प्रेमलताताई चांदणे यांचे अभिनंदन करत समाजीक परिवर्तनाच्या लढ्यात आपणही त्यांच्या सोबत असल्याचे नमुद केले. महापुरुषांच्या विचारांची गावकुसा बाहेरील उपेक्षित वंचित दीन दुबळ्या भगीनींना जेव्हढी गरज आहे, कदाचित त्यापेक्षा जास्त पांढरपेशा समाज व्यवस्थेतील गगनचुंबी झमारतीत. बंगल्यात, वाड्यात आणि राजवाड्यात राहाणाऱ्या भगीनींना जास्त आहे. कारण कालही स्त्रीची गणना शुद्रादी शुद्र म्हणून केली जायची आणि आजही पाहिजे तेव्हढा बदल झाला नाही या बद्दल खंत व्यक्त केली. अजिंक्य भैय्या चांदणे यांनी आपल्या उपेक्षित वंचीत दीन दुबळ्या समाज बांधवांचे दुःख आणि दारिद्र्य मांडत त्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणायचे असेल तर महापुरुषांच्या विचारांची गरज असल्याचे नमुद केले. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन लोणके सर यांनी केले. या कार्यक्रमात पाचशे भगींनींना मान्यवरांच्या हस्ते साडी चोळी देऊन सन्मानित करण्यात आले. या उपक्रमात परिसरातील भगीनीं मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

# नियमाप्रमाणे अनुदानापासून कोणत्याही शेतकऱ्याला वंचित ठेवणार नाही-तहसीलदार चव्हाण

अंबड । प्रतिनिधी

**अतिवृष्टी अनुदान (सप्टेंबर-ऑक्टोबर २०२४) व इतर अनुदान योजनांच्या पडताळणी, कार्यवाही आणि गैरप्रकारांबाबत फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे परंतु नियमाप्रमाणे पात्र असलेल्या शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवणार नाही तहसीलदार विजय चव्हाण यांनी एका पत्रकाद्वारे करण्यात आले आहे. सर्व शेतकरी आणि संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांना अत्यंत महत्त्वाची सूचना देण्यात येत आहे की, अंबड तहसील कार्यालयामार्फत अतिवृष्टी अनुदान सप्टेंबर-ऑक्टोबर २०२४ च्या प्रलंबित प्रस्तावांवर आणि लाभार्थी याद्यांवर युद्धपातळीवर कार्यवाही सुरू आहे. या प्रक्रियेतील पारदर्शकता आणि अचूकता जपण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.**

सद्यस्थितीतील कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे आहे. अतिवृष्टी अनुदान (सप्टेंबर-ऑक्टोबर २०२४) पडताळणी अतिवृष्टी अनुदानासाठी प्राप्त झालेल्या एकूण ३७६ अर्जांच्या प्रभागनिहाय याद्यांचे व्हॅलिडेशन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. छाननीअंती, त्यापैकी १६० अर्ज पात्र ठरल्याने मंजूर करण्यात आले आहेत. कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्याने ५५ अर्ज (एका टप्प्यात ३० व दुसऱ्या टप्प्यात २५) पुनर्तपासणीसाठी ठेवण्यात आले आहेत. उर्वरित १०१ पात्र अर्जांची संगणक प्रणालीवर नोंद करण्याची प्रक्रिया आज ३०/०७/२०२५ रोजी पूर्ण करण्यात येईल.



फळबाग व इतर अनुदान योजना अतिवृष्टी अनुदानाच्या धर्तीवर, उर्वरित सर्व फळबाग योजनेच्या लाभार्थ्यांच्या प्रस्तावांची देखील सखोल तपासणी हाती घेण्यात येत आहे. सर्व लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे तात्काळ सादर करावीत. कागदपत्रे प्राप्त होताच, पुढील दोन ते तीन दिवसांत सर्व पात्र लाभार्थ्यांचे अर्ज अपलोड केले जातील. याव्यतिरिक्त, शासनाच्या इतर सर्व प्रलंबित अनुदान योजनांचीही तपासणी केली जाणार आहे.गैरप्रकारांबाबत कठोर कारवाईचा इशारा यावेळी देण्यात आला आहे.अनुदान प्रक्रियेत कोणत्याही स्तरावर गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही. तपासणी दरम्यान, जाणूनबुजून चुकीची माहिती सादर करणारे खातेदार (शेतकरी) आणि अशा चुकीच्या माहितीची पडताळणी न करता ती पुढे पाठवणारे संबंधित तलाठी यांच्यावर कोणताही मुलाहिजा न ठेवता थेट फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल. कोणत्याही दोषी व्यक्तीची गय केली जाणार नाही आणि त्यांच्यावर कायद्यानुसार कठोर ते कठोर कारवाई केली जाईल, याची सर्वांनी गांभीर्याने नोंद घ्यावी. पात्र लाभार्थी यांची पडताळणी झाल्यानंतर पुढील एका आठवड्याच्या आतमध्ये सर्वच्या सर्व अनुदान त्यांच्या खात्यावरती देण्यात येणार आहे याबाबत कोणतेही प्रकारचे अफवांवरती विश्वास ठेवू नये त्यांनी तलाठी मंडळ अधिकारी यांचे मार्फत आपल्या अनुदानाची अनुषंगाने असलेले कागदपत्रे तसेच फळबागांचा पुरावा सादर करावा जेणेकरून तात्काळ कारवाई करणे शक्य होईल. ही तपासणी सॉफ्टवेअरने रिव्होलिटेशन केल्यामुळे करण्यात येत असून पूर्वानुभव पाहता मागील वेळेस झालेले घोटाळा यामुळे सक्त तपासणी करणे आवश्यक तपासणी करण्यात येत आहे.कोणत्याही पात्र लाभार्थ्यांना लाभापासून वंचित ठेवण्यात येणार नाही याची ग्वाही याद्वारे देण्यात येत आहे. अशी माहिती तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिली आहे.



**परळी:महादेव मुंडे हत्या प्रकरणात कुटुंबाला न्याय देण्याबाबत आज परळीच्या दौऱ्यावर असताना आणि परतीच्या मार्गावर आ.रोहित पवार, संदीप क्षीरसागर आदी परळी येथील महादेव मुंडे कुटुंबाची भेट संपल्यानंतर स्नॅक्स पार्टी करताना या फोटो मध्ये दिसत आहेत. यावरून खरंच महादेव मुंडे कुटुंबाची काळजी आहे.**

## पान १ वरून...

### एसआयटी नेमून वाल्मिक कराडच्या

नावे आली आहेत याची सविस्तर माहिती दिली. यावेळी आमदार रोहित पवार यांनी पोलिस अधिक्षक नवनीत कावत यांच्याशी संपर्क करुन तपासाबदल माहिती घेतली. यावेळी माध्यमांशी बोलताना रोहित पवार यांनी सांगितले की, या खून प्रकरणात बाळा बांगर यांनी काही नावे सांगून पुरावे सादर केले आहेत. याचा आधार घेऊन एफआयआर मध्ये ही नावे घ्यावीत व सखोल चौकशी करून कारवाई करावी. तसेच या प्रकरणात वाल्मिक कराड व त्यांच्या दोन्ही मुलांची नावे आली आहेत. वाल्मिक कराडची एक हजार कोटी रुपयांची संपत्ती जप्त करून एस आयटी नेमून संपत्तीची चौकशी करा व त्यात कोण पार्टनर आहे ते शोधून काढावे, ज्यांची संपत्ती लुटली आहे त्यांना ती वाटप करावी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या कुटुंबाला वेळ द्यावा किंवा त्यांनी स्वतः या कुटुंबाला संपर्क करावा व कारवाई करावी अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे.

-----------

### २६ लाख लाडक्या बहिणी

अपात्र लाडक्या बहिणींबाबतची खरी माहिती समोर येणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच १४ हजार पुरुषांनी योजनेचा लाभ घेतला याची पडताळणी सुरू असल्याचेही अदिती तटकरे म्हणाल्या आहेत.

--------

### शाळेमध्ये घुसून गुंडगिरी करणारे

किरकोळ भांडणाचे कारणामुळे पाथरूड गल्लीतील काही मुलांनी शाळेमध्ये घुसून मुलास आणि मुलाच्या पालकाला मारहाण केली होती. बीड शहर पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून १५ आरोपींविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करून घेतला होता. सीसीटीव्ही फुटेज वरून सर्व आरोपी निष्पन्न झाले आहे. या १५ आरोपी पैकी आठ प्रमुख आरोपी यांना पोलिसांनी जेरबंद केले आहे. गुन्हा दाखल केल्या पासून काही आरोपी फरार होते. त्यातील चार आरोपी हे अल्पवयीन असल्याने त्यांना पालकांच्या ताब्यात दिली आहे.अटक झालेल्या आरोपींमध्ये. अनेश नरेश गायकवाड वय २५ वर्ष, साहिल नरेश गायकवाड व २१ वर्ष, शेखर रत्नाकर जाधव वय ३१ वर्ष, आकाश पालकर जाधव वय ३९ वर्ष. सर्व राहणार पात्रुड गल्ली अशी आहेत. यातील दोघेजण हे अभिलेखावरील गुन्हेगार आहे आणि त्यांच्यावर अगोदरच मारहाणीची गुन्हे दाखल आहेत. अशा गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सांगितले आहे अशा घटना पुन्हा होऊ नये यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी आरोपी अटकेबाबत सविस्तर सूचना दिल्या होत्या. सदरील कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे बीड शहरचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोउपनि महेश जाधव, पो.ह. संजय राठोड, गहिनीनाथ बावनकर, राम पवार, बापू गायकवाड यांनी केली आहे.

------------

### एसटी पार्सलची जबाबदारी

चालविली जाते. महामंडळाची पार्सल सेवा ही विश्वसनीय असल्याने त्याकडे मोठा ओढा असला तरी अलीकडच्या काळात पार्सल गहाळ होण्याच्या तक्रारी येत असल्याने याबाबत महामंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. पार्सलची जबाबदारी ही चालक आणि वाहकावर सोपवण्यात आली असून या निर्णयाला चालक-वाहकांकडून विरोध होण्याची शक्यता आहे.

-----------.

### कचऱ्याच्या ढिगाऱ्यापासून ५०

पालिकेने केले डम्पिंग ग्राउंड या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित केले होते मात्र नगरपालिका प्रशासन अशा गोष्टीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे दीपमाळ ही ऐतिहासिक ठेव आहेत खंडोबा मंदिर देखील पुरातन विभागाची ठेव आहेत असे असताना हा परिसर स्वच्छ ठेवणे ऐवजी या परिसरामध्ये शहरातील घाण आणि कचरा टाकला जातो विशेषता हे काही डम्पिंग ग्राउंड नाही तरीपण पालिका मनमानी करत या भागातील नागरिकांच्या आरोग्याला आमंत्रित करीत आहे हा विषय गंभीर असला तरी आता पंधरा ऑगस्ट रोजी पालकमंत्री अजितदादा पवार ध्वजारोहण करणार आहेत याच निमित्ताने नगरपालिका वनविभाग खंडेश्वरी परिसरामध्ये वृक्षारोपण करत आहेत पालकमंत्र्यांच्या हस्ते होणाऱ्या वृक्षारोपणाला शुभेच्छा साहेब परंतु वृक्षाची जोपासणूक होणे देखील गरजेचे आहे विशेष म्हणजे बीड शहरातील जी घाण आणि कचरा टाकला जातो तिथून काही हाकेच्या अंतरावर म्हणजेच ५० फुटावरच हे वृक्षारोपण केले जात आहे तेव्हा आता पालकमंत्री येणार असल्याने हा कचरा हटवला जाणार की नाही असाही प्रश्न उपस्थित होत आहे

-----------

### दहशतवाद्यांच्या पाकिस्तानी

ऐकून संपूर्ण देशाचा उर गर्वाने भरून येईल. ९ मे रोजी पाकिस्तानने जवळजवळ १००० मिसाईल्स आणि ड्रोन्सच्या मदतीने भारतावर मोठा हल्ला करण्याचा प्रयत्न केला, अशी माहिती मोदींनी संसदेत दिली.

**ट्रम्प यांनी मध्यस्थी केल्याचे फेटाळले**

आमचा हल्ला निश्चित होता, आमचे ध्येय निश्चित होते. भारताने ते लक्ष्य पूर्ण केले. त्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर स्थगित केले. जगातल्या कोणत्याही नेत्याने हा हल्ला थांबवण्यासाठी विनंती केली नाही हे मी जबाबदारीने सांगतो, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

--------

### मुंडे कुटुंबाच्या न्यायासाठी जरांगे

भाग म्हणून, १ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता बीड शहरातील कॅनॉल रोड येथील रामकृष्ण लॉन्स येथे बीड जिल्हा सकल मराठा समाजाच्या वतीने सर्वधर्मीय व सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.या बैठकीला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि महादेव मुंडे यांचे कुटुंब उपस्थित राहणार आहे. या महत्त्वपूर्ण बैठकीत आंदोलनाची पुढील दिशा निश्चित केली जाईल आणि महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे. जिल्ह्यातील सर्वपक्षीय आजी-माजी लोकप्रतिनिधी आणि नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन सकल मराठा समाज, बीड जिल्हा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

-------------

### वादग्रस्त मंत्र्यांचे राजीनामे

मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारमधील सहकारी आणि महायुतीच्या सर्वच मंत्र्यांना पोस्ट कॅबिनेटमधे सक्त ताकीद दिल्याची माहिती आहे. कॅबिनेट बैठकीनंतर मंत्री महोदयांसोबत आयोजित विशेष बैठकीत मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्त करत मंत्र्यांना इशारा दिला. वादग्रस्त वक्तव्य टाळा, माध्यमांशी संवाद कमी करा, आणि जर वाद निर्माण होणारी कृती घडली तर तात्काळ स्वत: योग्य ते स्पष्टीकरण द्या, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केल्या आहेत. गेल्या काही दिवसांत महायुतीमधील मंत्र्यांच्या वक्तव्यावरुन आणि कृतीवरुन जनतेमध्ये तीव्र संताप व नाराजी पाहायला मिळत आहे. त्यावरुनच, विरोधकही आक्रमक होत मंत्र्यांचा राजीनामा मागत आहेत. त्याच, पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी पोस्ट कॅबिनेट घेत सूचना केल्या आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माणिकराव कोकाटे, शिवसेनेचे योगेश कदम आणि संजय शिरसाट, भाजपचे नितेश राणे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. त्यामुळे, सरकारची प्रतिमा मलिन होत असल्याने मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली. यापुढे जर पुन्हा सरकारला अडचण निर्माण होईल अशी कृती झाली तर मला विचार करावा लागेल, अशा शब्दात देवेंद्र फडणवीस यांनी इशारा दिला आहे.

**अजितदादांकडून कोकाटेंना समज**

दरम्यान, माणिकराव कोकाटे यांचा आज राजीनामा घेतला जाणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. त्याच अनुषंगाने माणिकराव कोकाटे यांनी मंगळवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. या भेटीत अजित पवारांनी कोकाटेंना दम भरला असून यापुढे कुठलीही चूक पाठीशी घातली जाणार नसल्याचे म्हटले आहे. त्यामुळे, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी आजच मंत्र्यांना इशारा दिला आहे.

--------

### संपादिका जान्हवी धनंजय मुंडे

सरकार मानवी हक्क आणि जनतेचे प्रश्न या विषयात पदवी घेत आहे याच युनिव्हर्सिटी मध्ये पदवी घेत असताना युनिव्हर्सिटी अंतर्गत अमेरिकेतील आघाडीची वृत्तसंस्था असलेल्या सिटी मिरर या वृत्तसंस्थेत फोटोग्राफी आणि लेखन यांची प्रमुख जबाबदारी जानवी धनंजय मुंडे हिच्यावर होती तिने ती यशस्वीरित्या सांभाळली आता तिच्यावर याच सिटी मिरर वृत्तसंस्थेच्या संपादक पदाची प्रमुख जबाबदारी देण्यात आली आहे एक मुलगी एवढ्या मोठ्या वृत्तसंस्थेचा कार्यभार पाहत आहे सांभाळत आहे ही बीड जिल्ह्यासाठी आणि भारतासाठी अभिमानाची आणि आनंदाचे बाब म्हणावी लागेल वृत्तपत्र आणि वृत्तसंस्थे या क्षेत्रात एक मराठी मुलगी प्रदेशात आपला झेंडा फडकवत आहे याचा अभिमान मुंडे कुटुंबीयांसोबतच जिल्हा वाशी यांना देखील व्हायलाच हवा या युनिव्हर्सिटी मध्ये जानवी धनंजय मुंडे दोन विषयाची पदवी घेत आहे मानवी हक्कासाठी अभ्यास हे तिचे खास क्षेत्र आहेत कॉलेजमधल्या वृत्तपत्रात यादी फोटो आणि विशेष लेख विभागाचे प्रमुख होती आता ती त्याच वृत्तपत्राची मुख्य संपादक देखील आहे सिटी मिरर हे अमेरिकेतील प्रसिद्ध वृत्तसंस्था असून सध्या समाज सरकार आणि लोकांचे प्रश्न यावरती लिखाण करत आहेत या सोबतच ती कारागृहामधील शिक्षण देणाऱ्या संस्थेत संशोधन करत आहे धनंजय मुंडे यांनी एक स्पष्ट करताना मला अभिमान आहे असा मुलीला स्टेप करत बाप म्हणून अभिमान वाटतो मेहनत संवेदनशीलता आणि ती करते ते यशासाठी नाही तर समाजासाठी तिचे खऱ्या अर्थाने मोठेपण आहे बाप म्हणून मला अभिमान वाटतो असेही धनंजय मुंडे यांनी एक्स पोस्टवर म्हटले आहे.

--------------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
३
बुधवार दि. ३० जुलै २०२५

## थोडक्यात...



### केएसकेच्या कृषी दूतांकडून राबवला हिंगणी हवेली येथे ग्रामीण मूल्यांकन उपक्रम

बीड । प्रतिनिधी

के एस के काकू कृषी महाविद्यालयाच्या कृषीदूतांकडून हिंगणी हवेली येथे सहभागी ग्रामीण मूल्यांकन उपक्रम यशस्वीपणे राबवला. ग्रामस्थांच्या थेट सहभागातून गावातील समस्या, संसाधने आणि विकासाच्या गरजांचा सखोल आढावा घेण्यात आला. या प्रक्रियेत शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून, त्यांच्या अनुभवावर आधारित उपयुक्त उपाययोजना मांडण्यात आल्या. स्थानिक अडचणी, शेत शिवारातील आव्हाने आणि ग्रामविकासाच्या दृष्टिकोनातून करण्यात आलेली चर्चा उपयुक्त ठरली. शेतकरी,शिक्षक, विद्यार्थी यांचा या उपक्रमात सक्रिय सहभाग होता. उपक्रमात कृषी दूत गुरुदेव गाताडे,महेश गायकवाड, शरद गायकवाड, कोमटी कृष्णतेजा, कुलकर्णी तेजस, कालीगोटा चरण, महेश भागवत गायकवाड यांनी गावकऱ्याची संवाद साधून पीआरएची रचना अमलात आणली. महाविद्यालयाचे सहसचिव डॉ,जी, व्ही,साळुंखे, प्राचार्य एस,पी, मोरे कार्यक्रम समन्वयक डॉ,एस,टी शिंदे, प्रा, डी,बी राठोड, प्रा, एल, एम बोंद्रे यांचे मार्गदर्शन या उपक्रमास लाभले. या उपक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये जागरूकता वाढवून, स्थानिक विकासाच्या दिशेने सकारात्मक पाऊल उचलले गेले आहे.



### चांगल्या संस्कारातूनच चांगली पिढी घडते –ठोंबरे

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा या गावांमध्ये उपक्रमानिमित्त आयोजीत कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते श्री. ठोंबरे सर यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, ''चांगल्या संस्कारातूनच चांगली पिढी घडते. शिक्षणासोबतच नैतिक मूल्यांचे संस्कारही विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे गरजेचे आहे.''या प्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष श्री. कलचुरे साहेब, मुख्याध्यापक श्री. चव्हाण सर, गावचे सरपंच श्री. दादासाहेब घोडके, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. शिवाजी खोरदे, उपाध्यक्ष श्री. राहुल घोडके, तसेच ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री. अतुल घोडके, श्री. विभा साळुंखे, दामोपंत गव्हाणे सर, श्री. खांडवी सर श्री. लगड सर, श्री. काळे सर,श्री. दातीर सर, श्री.जाधव सर, श्री. मस्के सर, श्रीम.जगताप मॅडम, खोरदे मॅडम, आणि डॉ. सतीश सायंबर सर यांची उपस्थिती लाभली.या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक साधनांची कमतरता भरून निघाली असून, उपस्थित मान्यवरांनी ट्रस्टच्या या स्तुत्य कार्याचे कौतुक केल. तर मुख्याध्यापक श्री चव्हाण सर यांनी ट्रस्टचे आभार मानले.

### आ.धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत शिवाईचे लोकार्पण

परळी : शहरात पर्यावरणपूरक व आधुनिक सार्वजनिक वाहतुकीच्या दिशेने मोठे पाऊल टाकण्यात आले असून, आज येथे ५ नवीन १२ मीटर लांबीच्या ई–बस दाखल झाल्या. या बस १.५ तास चार्जिंग केल्यानंतर सुमारे ३०० किलोमीटरचे अंतर सहज पार करू शकतात. या बसांमुळे परळी परिसरातील प्रवाशांना एक स्वच्छ, सुरक्षित व किफायतशीर प्रवासाचा अनुभव मिळणार आहे.या बसांच्या शुभारंभ प्रसंगी परळीचे लोकप्रिय आमदार आदरणीय धनंजय मुंडे यांनी उपस्थित राहून बस सेवेचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी सांगितले की, ''ही सेवा परळीकरांसाठी एक अभिमानाची गोष्ट आहे. आपले शहर प्रगतीच्या मार्गावर असून ही ई–बस सेवा पर्यावरण बचावासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे.''

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून, मराठवाड्यात तीन हजार रुग्णांना २५ कोटी रुपयांची मदत!

## आरोग्य शिबिरातून १२ हजार नागरिकांना दिलासा

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरीब रुग्णांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष हा मोठा आधार बनला आहे. विशेषतः मराठवाडा विभागात जानेवारी ते जून २०२५ या अवघ्या सहा महिन्यांत तब्बल ३ हजार ३९ रुग्णांना २५ कोटी ५८ लाख ३१ हजार रुपयांची वैद्यकीय मदत करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून नागरिकांचा विचार करून जिल्हा कक्ष स्थापन करण्यात आले. त्यातून लाभार्थी नागरिकांची संख्या वाढली. त्यासोबतच आरोग्य शिबिर व रक्तसंकलन आदी उपक्रम प्रभावीपणे राबविणे सहज शक्य होत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुखरामेश्वर नाईक यांनी सांगितले.

### जिल्हानिहाय मदत :-

मागील सहा महिन्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ६३३ रुग्णांना ५ कोटी ३३ लाख ३८ हजारांची मदत करण्यात आली. बीड –६१० रुग्णांना ४ कोटी ८९ लाख ६ हजार, परभणी ५३३ रूग्णांना ४ कोटी ६७ लाख ८२ हजार, लातूर– ३८५ रूग्णांना ३ कोटी २९ लाख ५५ हजार, जालना–३६७ रूग्णांना ३ कोटी ११ लाख ४५ हजार, नांदेड– ३२३ रूग्णांना २ कोटी ८० लाख २० हजार, धाराशिव–२५७ रूग्णांना २ कोटी २१ लाख आणि हिंगोली– १३२ रूग्णांना १ कोटी १६ लाख रूपये प्रमाणे वैद्यकीय मदत करण्यात आली आहे.

### आरोग्य शिबिरे आणि रक्तदान

१ मे ते २५ जुलै दरम्यान जिल्हा कक्षाच्या मदतीने घेण्यात आलेल्या आरोग्य व रक्तदान शिबिरांमध्ये १२,४०९ नागरिकांची आरोग्य तपासणी तर २,३५३ नागरिकांनी रक्तदान केले.

### आवश्यक कागदपत्रे :-

आधार कार्ड, रेशन कार्ड, उत्पन्नाचे प्रमाणपत्र (१.६० लाखांपेक्षा कमी), वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र, रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असावी, अपघात असल्यास एफआयआर किंवा एमएलसी, अवयव प्रत्यारोपण असल्यास झेडटीसीसी नोंदणी पावती, सर्व कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात .–. या ईमेल वर पाठवावीत. अधिक माहिती करिता टोल फ्री क्र. १८०० १२३ २२११ या क्रमांकावर कॉल करावा.

### २० गंभीर आजारांकरिता मदत

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून २० गंभीर आजारांवर मदत केली जाते: त्यात, कॉक्लियर इम्प्लांट, हृदयविकार, किडनी/लिव्हर/बोन मॅरो प्रत्यारोपण, कर्करोग, अपघात, नवजात बालकांचे आजार, मेंदू विकार, डायालिसिस, भाजलेले रुग्ण, विद्युत अपघात आदींचा समावेश आहे.

### जिल्हा कक्षाच्या माध्यमातून मदत

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार पेपरलेस आणि डिजिटल प्रणाली तसेच जिल्हा कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. ज्यामुळे रुग्णांना मंत्रालयात येण्याची गरज भासत नाही.

रुग्णांनी प्रथम महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, किंवा धर्मादाय रुग्णालयांच्या योजनांचा लाभ घ्यावा. जर या योजनांद्वारे उपचार शक्य नसतील, तर, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाकडे संलग्न असणाऱ्या रुग्णालयातून अर्ज करता येतो. यामुळे शासकीय योजनांचा सुयोग्य वापर होतो आणि निधीचा उपयोग खऱ्या गरजू रुग्णांपर्यंत पोहोचतो.

जिल्हा, लाभार्थी नागरिक, रक्तदाते

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | ३,०५८ | १६१ | बीड | १,१०० | ७५ |
| परभणी | ७६३ | ४६७ | लातूर | २,५२२ | ८५२ |
| जालना | ३७३ | ६४ | नांदेड | २२६ | ६३९ |
| धाराशिव | ७४२ | ३८ | हिंगोली | ३,६२५ | ५७ |

# बाबरीसह राजाभाऊ मुंडे राष्ट्रवादीत करणार प्रवेश

बीड । प्रतिनिधी

विधानसभा निवडणूकीत बंडखोरी करत आ.प्रकाश सोळंके यांच्या विरोधात राजाभाऊ मुंडे, बाबरी मुंडे या पिता–पुत्रांनी दंड थोपटले होते मात्र आता प्रकाश सोळंके यांच्या मार्फतच ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करणार आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ते भाजपाचे सक्रीय कार्यकर्ते होते. आता मात्र माजी आ.केशवराव आंधळे आणि राजाभाऊ मुंडे यांच्यात फारसे जमत नसल्याने ते राष्ट्रवादीत प्रवेश करत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.




राज्यामध्ये महाविकास आघाडीचे सरकार असताना २००८–०९ मध्ये राजाभाऊ मुंडे यांनी बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केला होता मयत असलेल्या तसेच अस्तित्वात नसलेल्या हजारो शेतकऱ्यांच्या नावावर किंवा कर्ज प्रकरणे करून मुंडे यांनी शासनाची कोट्यावधी रुपयांची फसवणूक केली होती. तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील राजाभाऊ मुंडे यांच्या या भ्रष्ट कारभाराविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश देत त्यांना तब्बल २८ महिने जेलमध्ये सडवले होते. बँकेच्या प्रकरणातच राजाभाऊ मुंडे यांचे चिरंजीव बाबरी मुंडे यांच्यावर देखील गुन्हा दाखल झाला होता आणि ते देखील जेलवारी करून आले होते.२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून उमेदवारी मिळाल्यानंतरही काकासाठी माघार घेणाऱ्या जयसिंह सोळुंके यांना पुढच्या निवडणुकीत माजलगाव मधून संधी मिळू नये यासाठीच आमदार सोळुंके हे मुंडे पिता पुत्राला जवळ करत असल्याची चर्चा आहे.ज्या राजाभाऊ मुंडे आणि बाबरी मुंडे यांच्यामुळे बीड जिल्हा मध्यवर्ती बँक बुडाली त्यांना अजित पवारांकडे थाटात प्रवेश दिला जात असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. जे जेल मध्ये जाऊन आले त्यांना त्यांना प्रवेश देऊन अजित पवारांना राष्ट्रवादी काँग्रेस जरा जास्तच पवित्र करायची आहे की काय अशी देखील चर्चा सुरू झाली आहे.

### अंबाजोगाईत सुरसुमनांजली

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दि ३१ जुलै २५ रोजी संध्याकाळी ६ वाजता बाळशास्त्री जांभेकर पत्रकार भवन येथे स्वर्गीय मोहंमद रफी यांना श्रद्धांजली देण्यासाठी सुरसुमनांजली चे आयोजन करण्यात आले आहे. तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, परमेश्वर गित्ते, दत्ता आंबेकर, अभय जोशी,डॉ संदीप जैन,वाजेद भाई , पत्रकार संघ ,वसुंधरा प्रतिष्ठान यांनी कळवले आहे. या कार्यक्रमात अंबाजीगाईतील गायकांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घ्यावा असेही कळवले असून सर्वच संगीत प्रेमी रसिकांनी उपस्थिती द्यावी अशी आग्रहाची विनंती करण्यात आली आहे. अंबाजोगाई शहर हे सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न असलेल्या याठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल असते. अनेक दशके रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे स्व.मोहम्मद रफी यांच्या आदरांजली निमित्त हा कार्यक्रम होत आहे.



## पान ६ वरून...

### उर्दू, मराठी शाळांजवळच नगर

माहिती समोर आली आहे. या परिसरात उघड्यावर पडलेला कचरा व दुर्गंधीमुळे विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या गंभीर प्रकाराची तात्काळ दखल घेऊन शाळेच्या भिंतीलगतचा सर्व कचरा हटवावा, परिसराची स्वच्छता करावी आणि या ठिकाणी पुन्हा कधीही डंपिंग करण्यात येणार नाही, याची नगर परिषदेकडून खात्री देण्यात यावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसने दिला आहे. स्थानिक पालक, शिक्षक, वसाहतीतील नागरिकांमध्येही याविरोधात तीव्र संताप व्यक्त होत असून, शाळेच्या सभोवतालचा परिसर स्वच्छ व आरोग्यदृष्ट्या सुरक्षित ठेवण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. नगर परिषद प्रशासन या प्रश्नाकडे गांभीर्याने कधी पाहणार, हा खरा प्रश्न सध्या उभा राहिला आहे.

### डॉक्टर दत्ता नलावडे डिलीट

त्यांना मार्गदर्शक म्हणून डॉक्टर शिवाजी शिंदे यांनी काम पाहिले .

अत्यंत उत्तम पद्धतीने मार्गदर्शन केल्याने तसेच महाराष्ट्रातून मोजक्याच लोकांमध्ये व बीड जिल्ह्यातील दोन लोकांमध्ये नलावडे यांचे या सन्मानासाठी नामांकन झाले . या सन्मानामुळे त्याचं अनेक स्तरातून स्वागत होत आहे . महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण व संशोधन परिषदेचे सर्व सन्माननीय संचालक ,शिक्षण विभागातील मान्यवर मंडळी ,बालविकास सामाजिक प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी ,संस्कृती विद्यालयातील सर्व शिक्षक ,बालगोपाळ व पालक वृंद यांच्याकडूनही नलावडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### मंत्री पंकजा मुंडे यांच्या

जि.प. माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी जाधव सर, केशव डोंगरे सर, श्रीमती शीलाताई सोनवणे, बारगजे सर, घुगे सर, वारे सर, पवार सर, सोनवणे सर, उरणकर सर, तळेकर सर शिक्षकांच्या उपस्थितीमध्ये मान्यवर अर्जुन (बाप्पा )खेडकर, हौसराव जायभाये, दिलीप तळेकर, उमर शेख, हनुमंत सोनवणे, नामदेव खेडकर, कल्याण ढाकणे, लक्ष्मण सोनवणे, भरत सोनवणे, संतोष सोनवणे, उमेश खेडकर, बाबासाहेब जायभाये, संतोष जायभाये, बाबुराव सोनवणे, बाळू सानप आदी मान्यवर ग्रामस्थांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या वतीने पंकजाताईच्या वाढदिवसानिमित्त मनोगतही व्यक्त करण्यात आले.

### सव्वा तीन किलो चांदी

सिल्वर रंगाची कार जिचा पासिंग क्र. १२ ८७०६ ही त्यांचे राहते घरासमोरुन कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेले म्हणून पोलीस ठाणे अंबड येथे गुरनं. ३८१/२०२५ कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर १,५०,००० रु किंमतीची मारुती सुझुकी कंपनीची अल्टो सिल्वर रंगाची कार जिचा पासिंग क्र. १२ ८७०६ ही जप्त करण्यात आली आहे. तसेच सदर आरोपीतांनी पोलीस ठाणे फत्तेपुर जि. जळगाव येथील चोपडे नगर व पोलीस ठाणे वडोद बाजार जि. छत्रपती संभाजी नगर येथील आळंद येथील मेडिकल फोडले बाबत कबुली दिली असून आरोपीतां कडुन एकुण ७,१९,८२० रुपयाचा माल जप्त करण्यात आला आहे.वरील प्रमाणे एकुण ०४ घरफोडीचे व कार चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहे. नमुद आरोपीस पुढील तपासकामी पोलीस ठाणे घनसावंगी यांच्या ताब्यात दिले आहे.सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, सोबत स्थागुशाचे अमंलदार सैम्युअल कांबळे, भाऊराव गायके, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, लक्ष्मीकांत आडेप, सागर बाविस्कर, इरशाद पटेल, संदीप चिंचोले, सतिष श्रीवास, आक्रूर धांडगे, रमेश काळे, धीरज भोसले, कैलास चेके, सौरभ मुळे अशोक जाधवर यांनी केली आहे.

# 'जनता' च्या माजी विद्यार्थ्यांचा ३३ वर्षांनंतर अविस्मरणीय सोनेरी आठवणींना उजाळा

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील धानोरा येथील जनता विद्यालयाच्या १९९२–९३ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा अविस्मरणीय स्नेह मिलन सोहळा अर्थात गेट टुगेदर नगरच्या आनंदबन वॉटर पार्कमध्ये जल्लोषात साजरा करण्यात आला .

कालप्रवाहात हरवलेली मित्रमैत्रिणीची साथ, गालातल्या हसण्यांनी भरलेले आठवणींचे क्षण, आणि त्या निरागस बालपणाचा सोनेरी सुवास हे सगळं पुन्हा अनुभवायची दुर्मिळ संधी नुकतीच लाभली.धानोरा येथील जनता विद्यालयाच्या १९९२–९३च्या इयत्ता दहावीच्या बॅचने तब्बल ३३ वर्षांनी एकत्र येत आपल्या जुने दिन पुन्हा उजाळले. कार्यक्रमाची सुरुवात झाली ती निवेदिका ज्योती गोरे यांच्या बहारदार हृदयस्पर्शी आणि ओघवत्या निवेदनाने. त्यांच्या शब्दांच्या सुरेल लयीने सर्व वातावरण मंत्रमुग्ध झाले. जुन्या आठवणी, शालेय खोड्या, गुरुजनांचे संस्कार, आणि मैत्रीची अनमोल नाती या साऱ्यांनी संपूर्ण कार्यक्रमाला एक भावनिक आणि आनंददायी वळण दिलं. दिवसभर वॉटर पार्कमधील जलक्रीडा, पूलमध्ये पोहण्याचा अनुभव आणि संगीतात रंगलेली थिरकती पावलं या साऱ्या गोष्टींनी सहभागींचा उत्साह शिगेला पोहोचवला. सर्वांनी बालपण परत जगल्याचा आनंद ओसंडून वाहत होता. मनोरंजक खेळ, विनोदी प्रसंग, गाण्यांचे जल्लोष, आणि पुन्हा एकदा ''आपले'' असल्याची भावना या साऱ्या आठवणींना कॅमेर्याने टिपण्याची घाई सर्वत्र दिसत होती. प्रत्येक चेहरा आनंदाने उजळलेला होता.



# आर्यवैश्य समाजातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेकडे देखील आपले ध्येय म्हणून बघावे – गादेवार

केज । प्रतिनिधी

समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा ओढा इंजिनिअरिंग , डॉक्टर , व सी ए याकडे आहे हि चांगली बाब आहे पण आता यापलीकडे जाऊन आता स्पर्धा परिक्षेंच्या माध्यमातून मोठ्या पदांवर कार्य करण्याची महत्वाकांक्षा देखील बाळगावी लागेल ती काळाची गरज आहे असे स्पष्ट मत महाराष्ट्र आर्यवैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांनी व्यक्त केले ते बीड जिल्हा महासभेच्या वतीने केज येथे आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार व पंच्याहत्तर वर्ष पूर्ण केलेल्या व्यक्तींच्या अमृत महोत्सव सोहळ्या प्रसंगी बोलत होते.

केज येथील श्रीराम मंगल कार्यालयात रविवार दि २७ रोजी आयोजित या सोहळ्यास अध्यक्ष म्हणून नंदकुमार गादेवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून गोविंद बिडवई , प्रदीप मनाठकर , सदानंद मेडेवार हे होते , तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ सतिष साळुंके व अमृत चे मराठवाडा व्यवस्थापक सुशांत देशपांडे, यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना गादेवार म्हणाले कि ; पारंपरिक उद्योगांना थोडेसे बाजूला करत मागील काही वर्षात आपल्या समाजातील विद्यार्थ्यांनी डॉक्टर , सी. ए , इंजिनिअर , आय टी क्षेत्रात आपले करिअर निवडले आता यासोबतच आणखीन नवीन दिशांची निवड देखील करावी लागणार आहे यात आता विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांकडे लक्ष केंद्रित करत शासनाच्या मोठ्या पदांवर देखील विराजमान होणे गरज असल्याचे सांगितले तसेच समाजातील पंचाहत्तरी पूर्ण केलेल्या व्यक्तींचा अमृत महोत्सव सार्वजनिक मंचावर साजरा होणाऱ्या या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमातून त्यांचा सत्कार करता येण्याचे भाग्य आपणास मिळाल्याचा आनंद असल्याचे त्यांनी नमूद केले.



# कर्मचाऱ्यांनी आपल्या घराप्रमाणे कार्यालय स्वच्छ ठेवावे –सीईओ मीन्नु

जालना । प्रतिनिधी

कर्मचारी यांनी आपल्या घराप्रमाणे कार्यालय स्वच्छ ठेवावे, स्वच्छ वातावरणात मन प्रसन्न राहून काम करण्याची उर्जा वाढते असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नु पी.एम यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नु पी एम.यांच्या सह जिल्हा परिषदेतील अधिकारी कर्मचार्यांनी आज जिल्हा परिषदेच्या परिसरात श्रमदान केले यावेळी त्या बोलत होत्या.



मीन्नु यांनी सीईओ चा पदभार घेतल्यापासून जिल्हा परिषदेच्या परिसरातील स्वच्छतेवर विशेष भर दिला आहे. कार्यालयातील वातावरण स्वच्छ व प्रसन्न असेल तर मनुष्य अधिक प्रभावीपणे काम करू शकतो, या वर त्यांचा विश्वास आहे. कार्यालयातील स्वच्छते नंतर त्यांनी आता परिसर स्वच्छतेवर लक्ष केंद्रित केले आहे. जिल्हा परिषदेतील पार्किंग ठिकाणासह मुख्य गेट ,झेंडा वंदन परिसर , आदि सर्व ठिकाणाचा ओला व सुका कचरा संकलित केला, कार्यालयीन परिसरात गोळा केलेले प्लास्टिक रोटरी क्लब जालना यांना देण्यात आले तर ओला कचऱ्यापासून सेंद्रिय खत निर्मिती केली जाणार आहे.

आप आपल्या ठिकाणचा कचरा गोळा करून त्याची व्यवस्था करण्या बाबत परिसरातील हॉटेल धारकांना त्यांनी सूचित केले आहे. आगामी कालावधीत परिसरात घाण होणार नाही याची जबाबदारी हॉटेल धारकांची राहील. कार्यालयातील एकत्रितपणे श्रमदान केल्याने जिल्हा परिषद परिसर स्वच्छ दिसत असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.यावेळी प्रकल्प संचालक सुनीलकुमार पठारे , मुख्य वित्त व लेखा अधिकारी राजू सोळुंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी लिंबाजी बारगिरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी(बाक) कोमल कोरे, शिक्षणाधिकारी संगीता भागवत , कृषी अधिकारी पी.बी. बनसावडे, कक्ष अधिकारी , सहायक प्रशासन अधिकारी , कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# रुग्णसेवेचा वसा जोपासताना प्रामाणिकपणा हा यशाचा धागा –डॉ.विठ्ठल लहाने

दिंद्रुड । प्रतिनिधी

**वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टरांनी रुग्णसेवेचा वसा जोपासत असताना प्रामाणिकपणा हाच यशाचा धागा असल्याचे मत सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांनी व्यक्त केले. दिंद्रुड येथील तांबवेश्वर हॉस्पिटल व आयसीयू युनिटच्या उद्घाटन प्रसंगी रविवारी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.**

कार्यक्रमास माजलगाव तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.मधुकर घुबडे, सपोनि महादेव ढाकणे, पंढरी अर्बनचे अध्यक्ष सुरेश तिडके, शिवाजीराव बडे, बंडू खांडेकर, विकास बडे, रामचंद्र बसेट यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.लहाने पुढे बोलताना म्हणाले की, रुग्णसेवा करताना रुग्णांवर आपली उपचार करण्याची पद्धत, उपचार केल्याचे आपण त्यांच्याकडुन कसे पैसे घेतो व पिडीत रुग्ण आपल्या सेवेप्रति व्यक्त करत असलेली कृतज्ञता यावर आपले भविष्य निर्भर आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीने उपचार मिळण्यासाठी डॉ.योगेश व डॉ.तेजस्विनी कराड यांचे तांबवेश्वर आयसियू यूनिट हे वरदान ठरणार असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. या युनिटच्या माध्यमातून खरी रुग्णसेवा घडेल असा विश्वास आपल्या भाषणात सर्वांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन शिवाजी हंगरगे यांनी तर आभार श्रीधर कराड यांनी मानले.



आई–वडिलांच्या हस्ते उद्घाटन

डॉ.योगेश यांनी वैद्यकीय क्षेत्रात मास्टर डिग्री मिळवली.पुणे मुंबईच्या ठिकाणी दवाखाना चालू करून अमाप पैसे जमा करण्यापेक्षा आई–वडिलांच्या ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीने उपचार मिळावे या स्वप्नाची स्वप्नपूर्ती करण्यासाठी कराड यांनी दिंद्रुड सारख्या ग्रामीण ठिकाणी आयसीयू युनिट चालू केले. आई सत्वशीला व वडील श्रीधरराव यांच्या शुभहस्ते फीत कापत या युनिट चे उद्घाटन करण्यात आले.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दुरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६
E-Mail ID:-tahsildarambad@gmail.com
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि–१०९ दिनांक–२२/०७/२०२५

जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती सोमनाथ भागुजी कोरडे रा.शिराढोण ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र. नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक
कोमल सोमनाथ कोरडे | मुलगी | ०९/०३/२००८

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.


तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक २२/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरीत
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अंबड

# दिवसा वीज देण्यासाठी सौरप्रकल्प पूर्ण करा!

## ऊर्जा विभागाच्या अप्पर सचिव आभा शुक्ला यांनी दिले निर्देश



नाशिक : राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.०' या महत्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून कृषी वाहिन्या सौरऊर्जित करुन शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी सौर प्रकल्प विकासकांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत. शेतकरी आणि राज्याच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षा असलेल्या या प्रकल्पाची कामे विहित कालावधीत व मुदतीत पूर्ण न करणाऱ्या विकासकांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच प्रकल्प पूर्ण करताना विकासकांच्या अडचणी सोडविण्यासाठी संबंधितांना संपूर्ण जिल्हा प्रशासन सहकार्य करणार असून, त्यामूळे प्रचंड गतीने कामे पूर्ण करण्याचे निर्देश ऊर्जा विभागाच्या अप्पर सचिव आभा शुक्ला यांनी दिले.

सौर कृषी वाहिनी योजनेला गतिमान करण्यासाठी नाशिक रोड येथील विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात महावितरण, सौर संबंधित सौर प्रकल्प विकासक आणि जिल्हा प्रशासनाचे अधिकारी यांची एकत्रित आढावा बैठक घेतली. यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीला महावितरणचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे अधिक्षक अभियंता संतोष सांगळे, निवासी उपजिल्हाधिकारी रोहित राजपूत मंचावर उपस्थित होते. पुढे बोलताना शुक्ला म्हणाल्या, की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून योजनेअंतर्गत राज्यात१६ हजार मेगावॉट सौर ऊर्जा क्षमता निर्माण करण्याचे भव्य उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.याचा थेट फायदा शेतकऱ्यांना होणार असून, त्यांना दिवसा भरवशाची वीज मिळेल आणि सिंचनाला मदत होणार आहे. या योजनेअंतर्गत प्रकल्प उभारणाऱ्या विकासकांनी कार्याची प्रगती ऑनलाइन पोर्टलवर अद्ययावत करावी. जे सौर प्रकल्प विकासक या सामाजिक दायित्वाच्या प्रकल्पामध्ये गंभीरतेने काम करणार नाहीत,त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्याचा इशारा दिला.

तसेच महावितरणचे उपकार्यकारी अभियंते यांनी सुद्धा या योजनेच्या दैनंदिन कामावर समन्वयक अधिकारी म्हणून लक्ष केंद्रित करून देखरेख ठेवण्याचे निर्देश शुक्ला यांनी दिले. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा आणि अखंडित वीज मिळणार असून यासाठी प्रशासनाच्या सर्वच घटकांची मदत राहणार आहे. सर्व यंत्रणांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. बैठकीला इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.

# आडसाली उसाच्या वाढीसाठी घ्या काळजी

सध्या आडसाली ऊस लागवडीचा कालावधी सुरू आहे. राज्यात मुख्यत्वे उसाची लागवड आडसाली, पूर्वहंगामी आणि सुरू हंगामात केली जात असली तरी आडसाली हंगाम फायदेशीर दिसून येतो. त्यामुळे शेतकरी सुद्धा आडसाली हंगामात ऊस लागवडीला प्राधान्य देतात. आडसाली उसाची उत्पादकता वाढविण्यासाठी जमिनीचे आरोग्य व्यवस्थापन, सुधारित ऊस वाणांचा आणि दर्जेदार बियाण्याचा वापर, रोप लागवड तंत्र, ठिबक सिंचनद्वारे पाणी आणि खत व्यवस्थापन, तण नियंत्रण आणि आंतरमशागत या पंचसूत्री तंत्रज्ञानाचा वापर केल्यास अपेक्षित उत्पादन मिळू शकेल.

अधिक उत्पादन देणारे ऊस वाण : आडसाली ऊस लागवडीसाठी को. ८६०३२ (निरा), कोएम ०२६५ (फुले २६५), फुले ऊस १५०१२, फुले ऊस १३००७ आणि व्हीएसआय ८००५ या अधिक उत्पादन देणार्या वाणांची लागवड करावी. महाराष्ट्रामध्ये को ८६०३२ वाणाची ५० ते ५५ टक्के आणि फुले २६५ वाणाची ३० ते ३२ टक्के क्षेत्रावर लागवड केली जाते.

बेणे निवड : लागणीसाठी ऊस बेणे मळयातील ९ ते ११ महिने वयाचे अनुवांशिकदृष्ट्या शुध्द आणि निरोगी बियाणे वापरावे. उसाचे बियाणे लांब कांड्यांचे व फुगीर डोळ्याचे आणि रसरशीत असावे. दर तीन वर्षानी बेणे बदलावे. अनुवंशिकदृष्ट्या शुध्द बेणे वापरल्यास ऊस उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ होते. २०२३ मध्ये पाडेगाव केंद्राने शिफारस केलेल्या फुले सुपरकेन नर्सरी तंत्रज्ञानातून उसाची रोपे शेतामध्येच तयार करून लागवड करावी.

बेणे प्रक्रिया : उसावरील काणी रोगाचा बंदोबस्त करण्यासाठी तसेच कांडीवरील खवले कीड व पिठ्या ढेकूण यांच्या नियंत्रणासाठी हेक्टरी १०० ग्रॅम कार्बेन्डॅझिम व ३०० मि.ली. डायमिथोएट १०० लिटर पाण्यात मिसळून बेणे १० मिनिटे बुडवावे. वरील प्रक्रियेनंतर ॲसिटोबॅक्टर १० किलो व स्फुरद विरघळविणारे जीवाणू खत १.२५ किलो ५०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात टिपरी ३० मिनिटे बुडवून नंतर लागवड करावी. जीवाणू



खताच्या प्रक्रियेमुळे ५० टक्के नत्र व २५ टक्के स्फुरद खताची बचत होते.

लागवड तंत्र : आडसाली उसाची लागवड १५ जुलै ते १५ ऑगस्ट या कालावधीत करावी. रिजरच्या सहाय्याने भारी जमिनीत १५० सें.मी. व मध्यम भारी जमिनीत १२० ते १३५ सें.मी. अंतरावर सऱ्या पाडाव्यात. सरीची लांबी उतारानुसार २० ते ४० मीटर ठेवावी. एक डोळा पद्धतीने डोळा वरच्या बाजूस ठेवून १ फुट अंतरावर व दोन डोळ्यांची टिपरी वापरावयाची असल्यास दोन टिपऱ्यामधील अंतर अर्धा फूट ठेवून लागण करावी. जोडओळ पट्टा पद्धतीने लागवड करावयाची असल्यास मध्यम जमिनीसाठी २.५ फुटावर तर भारी जमिनीसाठी ३ फुटावर सलग सऱ्या पाडाव्यात. भारी जमिनीत कोरड्या पद्धतीने आणि हलक्या जमिनीत ओल्या पद्धतीने उसाची टिपरीने लागवड करावी, जेणेकरून टिपरी पद्धतीने लागवड केलेल्या उसाची उगवण चांगल्या पद्धतीने होण्यास मदत होईल. रोपांनी लागवड करताना सरी ओली करून त्यानंतरच लागवड करावी किंवा उसाची रोपे पाण्यामध्ये दाबून लागवड करावी. जेणेकरून रोपांची मर होत नाही.आडसाली उसातील आंतरपिके : आडसाली हंगामात आंतरपिके घेताना योग्य आंतरपिकाची निवड करणे गरजेचे आहे, अन्यथा आंतरपिकामुळे मुख्य ऊस पिकाकडे दुर्लक्ष होऊन उत्पादनात घट येते. आडसालीमध्ये खरीप हंगामातील भुईमुग, चवळी, सोयाबीन व भाजीपाला इत्यादी आंतरपिके घेता येतात. ऊस पिकामध्ये ताग, धैंचा यासारख्या हिरवळीच्या पिकांचा आंतरपिक म्हणून समावेश करता येतो व बाळबांधणीच्यावेळी हिरवळीची पिके सरीमध्ये गाडून बाळ बांधणी करता येते. यामुळे जमिनीची सुपीकता टिकविण्यास मदत होते.

# शेळी-मेंढीच्या गोठ्यात या कारणामुळे संसर्ग पसरू शकतो



प्राणी जितका निरोगी राहील, म्हणजेच रोगांपासून दूर तितके त्याचे उत्पादन वाढेल. शिवाय पशुपालनाचा खर्चही कमी होईल. हे सर्व प्रकारच्या पशुपालनाच्या संदर्भात पशु तज्ञांनी सांगितले आहे. तुम्ही गायी-म्हशी पाळता किंवा शेळ्या-मेंढ्या. परंतु, जर मेंढ्या आणि शेळ्यांबद्दल बोलायचे झाले तर, तज्ञांच्या मते, पाच प्रमुख कारणे आहेत ज्यामुळे शेतीमध्ये संसर्ग पसरतो. मात्र, शेतातील दैनंदिन जीवनात काही गोष्टींचा समावेश केल्यास असे संक्रमण टाळता येऊ शकते. यासाठी जैवसुरक्षा मानकेही स्वीकारली जाऊ शकतात, परंतु असे केल्याने पशुपालनाचा खर्च वाढतो. तर उपायांचा अवलंब करताना एक रुपयाही खर्च होत नाही. आणि एवढेच नाही तर असे केल्याने झुनोटिक रोगांचा धोकाही टाळता येतो.

रोग उद्भवण्याची आणि पसरण्याची कारणे : प्राण्यांपासून जनावरे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी उत्पादनासाठी पाठवून.


संक्रमित जनावरांच्या मृतदेहांची अयोग्य विल्हेवाट लावल्यामुळे गट भागात जनावरांचे हस्तांतरण. जनावरांकडून शेतात येणारी दूषित माती आणि खत. शेतावर काम करणाऱ्या आणि तिथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून. कंत्राटदार, पर्यवेक्षक, शेजारी आणि शेताला भेट देणारे लोक. हात, शूज, कपडे, केस इत्यादींमधून येणारी दूषित माती आणि खत.

# असे करा नारळावरील इरिओफाईड कोळीचे व्यवस्थापन

नारळाचा उपयोग आपण विविध पदार्थ बनवन्यासाठी करतोच तर त्याच बरोबर त्याचे अनेक औषधी उपयोग देखील आहेत. भारतात अनेक शेतकरी नारळ बागेची लागवड करतात. नारळ बागेत सर्वात जास्त आढळून येणारी किडी म्हणजे इरिओफाईड कोळी. या किडीचा दुष्परिणाम फळाच्या वाढीवर मोठ्या प्रमाणात होतो. आपण आज इरिओफाईड कोळी किडीचे लक्षणे व त्यावरील उपाययोजना जाणून घेऊयात.

इरिओफाईड कोळीचे लक्षणे

१. इरिओफाईड कोळीचा प्रादुर्भाव झाल्यास नारळाच्या देठाखालील भागात पिवळे , पांढरे चट्टे दिसून येतात. कालांतराने त्या त्यांची वाढ होत जाते. २. नारळ फळाची वाढ खुंटते.: ३. नारळ फळावरील आवरण तडकते. ४. नारळ लहान असतांनाच त्यांची गळ होण्यास सुरुवात होते. उपाययोजना १. इरिओफाईड कोळी किडीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के कडुलिंब कीटकनाशक ७ मिली पाण्यात मिसळून मुळांद्वारे द्यावे.२. पिकास औषध दिल्यानंतर ४५ दिवसापर्यंत नारळाची काढणी करू नये. ३. फवारणी करण्यापूर्वी तयार झालेले



नारळ काढून घ्यावेत.४. या किडीच्या प्रादुर्भावामुळे खाली गळून पडलेले फुले , फळे गोळा करून नष्ट करून टाकावेत. अश्या प्रकारे कडुलिंबाचा वापर करून इरिओफाईड कोळीवर नियंत्रण आणता येते.

# कोंबडीपेक्षा तितर पक्ष्याच्या संगोपनातून मिळते अधिक उत्पन्न

तितराचा आकार कोंबडी आणि बदकांपेक्षा लहान असतो. त्यामुळे तेही त्यांच्यापेक्षा कमी अन्न खातात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना तितराच्या चाऱ्यावर कमी खर्च करावा लागतो. मोठी गोष्ट अशी आहे की १० तितरांसह देखील त्याचे अनुसरण सुरू करू शकता.

देशातील शेतकरी कोंबड्या आणि बदकांचे मोठ्या प्रमाणावर पालनपोषण करत आहेत. यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे. त्यामुळेच कोंबडी आणि बदक पालनपने हळूहळू व्यवसायाचे रूप धारण केले आहे. पण कुक्कुटपालनापेक्षा तितराच्या शेतीमध्ये जास्त उत्पन्न आहे. कारण त्याचे मांस आणि अंडी, कोंबडी आणि बदकांपेक्षा महाग विकली जातात. विशेषतः हिवाळ्यात तितराच्या मांसाची मागणी वाढते. अशा वेळी त्याचा दर जास्त होतो. विशेष म्हणजे तितर पालनासाठी परवाना घ्यावा लागेल. यानंतर तुम्ही तुमच्या घरी तितरांचे संगोपन सुरू करू शकता. सध्या बिहार, उत्तर प्रदेश आणि झारखंडसह अनेक राज्यांमध्ये शेतकरी मोठ्या प्रमाणावर तितरांचे पालनपोषण करत आहेत. तीतर शेती व्यवसाय सुरू करण्यासाठी जास्त पैसे खर्च करावे लागणार नाहीत. काही हजार रुपये खर्चून तीतर शेती व्यवसाय सुरू करू शकता. सराव सुरू केल्यानंतर काही दिवसांतच कमाई



सुरू होईल.

तीतर वर्षाला घालते ३०० अंडी : तितराचा आकार कोंबडी आणि बदकांपेक्षा लहान असतो. त्यामुळे तेही त्यांच्यापेक्षा कमी अन्न खातात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना तितराच्या चाऱ्यावर कमी खर्च करावा लागणार आहे. मोठी गोष्ट अशी आहे की तुम्ही १० तितरांसह देखील त्याचे अनुसरण सुरू करू शकता. असे तितर जन्माच्या ४५ दिवसांनंतरच अंडी घालू लागतात. तीतर एका वर्षात ३०० पर्यंत अंडी घालू शकतो. विशेष म्हणजे तितराची अंडीही कोंबडीच्या अंड्यांपेक्षा महाग विकली जातात. अशा परिस्थितीत तुम्ही अंडी विकून चांगला नफा मिळवू शकता.

तितराचे वजन झपाट्याने वाढते : तितराचे वजन जन्माच्या एका महिन्यात १८० ते २०० ग्रॅम होते. हिवाळ्यात त्याच्या मांसाला जास्त मागणी असते. तितराचे मांस खरेदी करण्यासाठी लोक भरपूर पैसे खर्च करण्यास तयार आहेत. हिवाळ्यात तितराचे मांस खाल्ल्याने शरीर उबदार राहते, असे म्हणतात. कारण याच्या मांसामध्ये फॅट्स, प्रथिने, कार्बोहायड्रेट्स आणि मिनरल्स मुबलक प्रमाणात आढळतात. त्याच वेळी, प्रत्येक ग्रॅम अंड्यातील पिवळ बलक १५ ते २३ मिलीग्राम कोलेस्ट्रॉल असते. तीतर नियमित खाल्ल्यास सर्दी होण्याची शक्यता कमी असते. त्याच वेळी, तीतर, गावांमध्ये लहान पक्षी म्हणून देखील ओळखले जाते. तुमची इच्छा असेल तर तुम्ही तितराच्या शेतीतून वर्षभरात चांगले उत्पन्न मिळवू शकता.अनुपालनासाठी परवाना घेणे आवश्यक : पूर्वी तीतर पालनाला भारतात परवानगी नव्हती. अशा परिस्थितीत लोक अन्नासाठी त्याची शिकार करायचे. त्यामुळे तितरांची संख्या हळूहळू कमी होत गेली. अशा परिस्थितीत सरकारने तितराच्या शिकारीवर बंदी घातली. तुम्हाला त्याचे अनुसरण सुरू करायचे असल्यास, तुम्हाला परवाना घ्यावा लागेल. हळुहळू ग्रामीण भागात तितराचे संगोपन झपाट्याने वाढत आहे.




## जागतिक दिवस: आंतरराष्ट्रीय फ्रेंडशिप डे

### महत्वाच्या घटना

७६२ : खलिफा अल मन्सूरने बगदाद शहराची स्थापना केली.
१६२९ : इटलीतील नेपल्स शहरात झालेल्या भूकंपात सुमारे १०,००० जण मृत्यूमुखी पडले.
१८३६ : अमेरिकेतील हवाई या शहरात पहिला इंग्रजी भाषिक वृत्तपत्र प्रकाशित झाले.
१८९८ : विल्यम केलॉग याने 'कॉर्नफ्लेक्स' विकसित केले.
१९०९ : अमेरिकन वैमानिक व शास्त्रज्ञ राईट बंधू यांनी सैन्यांसाठी पहिले विमान तयार केले.
१९३० : पहिला फुटबॉल विश्वचषक उरुग्वेने जिंकला.
१९६२ : 'ट्रान्स कॅनडा हायवे' हा सुमारे ८,०३० किमी लांबीचा जगातील सर्वात मोठा राष्ट्रीय महामार्ग सुरू झाला.
१९६६ : इंग्लंड च्या फुटबॉल संघाने पहिल्यांदा विश्वकप जिंकला.
१९७१ : अपोलो १५ चंद्रावर उतरले.
१९९७ : गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना 'राजीव गांधी राष्ट्रीय सद्भावना पुरस्कार' जाहीर
२००० : चंदन तस्कर वीरप्पनने अभिनेते डॉ. राजकुमार यांचे अपहरण केले.
२००० : कोणत्याही प्रवासी वाहनातून एखादा प्रवासी अपघाताने खाली पडून त्याचा मृत्यू झाल्यास त्याबद्दल त्या वाहनचालकाला जबाबदार धरता येणार नाही, असा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल
२००१ : राजस्थानातील अलवर येथील राजेंद्रसिंह यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर. छोटे बंधारे बांधून पाणी साठवण्याबाबत त्यांनी लोकसहभागातून मोठे काम केले आहे.
२०१२ : दिल्लीतील पावर ग्रिड खराब झाल्यामुळे उत्तर भारतील ३० कोटी पेक्षा जास्त लोकांची वीज खंडित झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१८ : एमिली ब्रॉंट इंग्लिश लेखिका (मृत्यू: १९ डिसेंबर १८४८)
१८५५ : जॉर्ज विलहेम फॉन सिमेन्स जर्मन उद्योगपती (मृत्यू: १४ आक्टोबर १९१९)
१८६३ : हेन्री फोर्ड फोर्ड मोटर कंपनीचे संस्थापक (मृत्यू: ७ एप्रिल १९४७)
१८८६ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय महिला चिकित्सक व समाजसुधारक मुथुलक्ष्मी रेड्डी यांचा जन्मदिन.
१९२३ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय इतिहासकार, संस्कृतज्ञ व सौंदर्यशास्त्री गोविंदचंद्र पांडे यांचा जन्मदिन.
१९२८ : साली पद्मश्री पुरस्कार व महाराष्ट्र भूषण पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय मराठी व हिंदी चित्रपट अभिनेत्री सुलोचना लाटकर यांचा जन्मदिन.
१९४५ : सेवानिवृत्त भारतीय नागरी सेवक व भारताचे माजी १६ वे मुख्य निवडणूक आयुक्त आणि लेखक नवीन चावला यांचा जन्मदिन.
१९४७ : अर्नोल्ड श्वार्झनेगर जन्माने ऑस्ट्रियन असलेले अमेरिकन शरीरसौष्ठवपटू, अभिनेते आणि कॅलिफोर्नियाचे ३८ वे राज्यपाल
१९५१ : भारतीय-इंग्रजी चित्रकार आणि मूर्तिकार गॅरी यहूदा यांचा जन्म.
१९६२ : भारतीय दहशतवादी यकब मेमन यांचा जन्म. (मृत्यू: ३० जुलै १९६२)
१९८० : इंग्लिश क्रिकेट खेळाडू जेम्स अँडरसन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६२२ : संत तुलसीदास यांनी देहत्याग केले.
१७१८ : पेनसिल्व्हेनियाचे स्थापक विल्यम पेन यांचे निधन.
१७७१ : अठराव्या शतकातील प्रसिद्ध इंग्रजी कवी, पत्र-लेखक व शास्त्रीय अभ्यासक थॉमस ग्रे यांचे निधन.
१८९८ : ऑटो फॉन बिस्मार्क जर्मनीचा पहिला चॅन्सेलर (जन्म: १ एप्रिल १८१५)
१९३० : बार्सिलोना फुटबॉल क्लब चे स्थापक जोन गॅम्पर यांचे निधन. (जन्म: २२ नोव्हेंबर १८७७)
१९४७ : ऑस्ट्रेलियाचे वे६ पंतप्रधान जोसेफ कूक यांचे निधन.
१९६० : 'कर्नाटक सिंह' गंगाधर बाळकृष्ण देशपांडे स्वातंत्र्यसैनिक (जन्म: ३१ मार्च १८७१)
१९८३ : वसंतराव देशपांडे शास्त्रीय व नाट्यसंगीत गायक (२ मे १९२०)
१९९४ : शंकर पाटील साहित्यिक, चित्रपट कथालेखक, ग्रामीण कथालेखक, भारतीय चित्रपट महामंडळाचे संस्थापक सचिव आणि 'बालभारती'चे संपादक. त्यांचे 'चोरा मी वंदिले', 'सागराचे पाणी', 'सवाल', 'बाजिंदा' हे कथासंग्रह तसेच 'सरपंच', 'इशारा', 'घुंगरू', 'कुलवंती', 'बेईमान', 'ललाट रेषा', 'सुन माझी सावित्री' या कादंबर्या हे गाजलेले साहित्य आहे. (जन्म: ८ ऑगस्ट १९२६)
१९९५ : डॉ. विनायक महादेव तथा 'वि. म.' दांडेकर अर्थतज्ञ, 'इंडियन स्कूल ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी' या संस्थेची त्यांनी उभारणी केली. त्यांचे 'पॉव्हर्टी इन इंडिया' हे पुस्तक गाजले (जन्म: ६ जुलै १९२०)
१९९७ : व्हिएतनामचा राजा बाओडाई यांचे निधन.
२००७ : स्विडिश चित्रपट दिग्दर्शक इंगमार बर्गमन यांचे निधन.
२००७ : इटालियन चित्रपट दिग्दर्शक मिकेलांजेलो अँतोनियोनी यांचे निधन.
२०११ : डॉ. अशोक रानडे संगीत समीक्षक (जन्म: २५ आक्टोबर १९३७)
२०१३ : भारतीय-इंग्रजी लेखक, कवी आणि नाटककार बेंजामिन वॉकर यांचे निधन. (जन्म: २५ नोव्हेंबर १९१३)

# १५९ कोटींच्या नगररोडचे निकृष्ट काम; अवघ्या ४ महिन्यात पडले खड्डे!

## गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह ;डागडुजी करून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न

बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील मुख्य शासकीय कार्यालयांना जोडणाऱ्या नगररोडच्या २४.५ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काम जून २०२४ मध्ये सुरू झाले. तब्बल १५९ कोटी रुपये खर्च करून हे काम अंतिम टप्प्यात आलेले असतानाच, अजून पूर्णही न झालेले रस्ते फक्त चार महिन्यांतच खचू लागले असून अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. विशेषतः जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच रस्त्यावर खड्डे पडल्याने नागरिकांत संतापाची लाट पसरली आहे. प्रशासनाने तातडीने डागडुजी करून विषय थोपवण्याचा प्रयत्न केला असला, तरी कामाच्या निकृष्ट दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी जिल्हाधिकारी बीड आणि महाराष्ट्र राज्य महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे लेखी तक्रार दाखल केली असून, दोषींवर कठोर कारवाईसह सखोल चौकशीची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.




पहिल्या छायाचित्रात अवघ्या ४ महिन्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नविन रस्त्यावर पडलेले खड्डे तर दुसऱ्या छायाचित्रात पडलेले खड्डे बुजविण्यात येऊन प्रकरण दाबण्याचा केविलवाणा प्रयत्न

हे रस्ते काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अंतर्गत साकेत कन्स्ट्रक्शन या कंपनीला दिले असून, डिसेंबर २०२४ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र वेळेत काम पूर्ण न झाल्याने आता नोव्हेंबर २०२५ ही नवीन डेडलाईन दिली आहे. कामाच्या विलंबाबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी साकेत कन्स्ट्रक्शन कंपनीवर १ कोटी रुपयांचा दंडही ठोठावला होता. तरीदेखील कामाच्या गतीत किंवा गुणवत्तेत कोणतीही सुधारणा झालेली दिसून येत नाही. शहरातील सर्वांत महत्त्वाचा, शासकीय कार्यालये आणि नागरी वर्दळीचा रस्ता चार महिन्यांतच खचू लागल्याने संपूर्ण यंत्रणेला धक्का बसला आहे. प्रशासनाकडून केलेली डागडुजी म्हणजे निकृष्ट काम झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न आहे, असा आरोप करत डॉ. गणेश ढवळे यांनी दोषींवर कठोर कारवाई आणि सखोल चौकशीची मागणी केली आहे. अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.



## विकास कामे करा, वंचित गरजू भोगवटाधारकांना घरकुल द्या!

### नवीदोद्दीन सिद्दिकी यांचे आ. प्रकाश सोळंके यांना निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील वार्ड क्रमांक ८ ची विकास कामे करा व शहरातल्या वंचित गरजू भोगवटा धारकांना घरकुल द्या. अशा मागण्या समाजवादी पक्षाचे माजलगाव तालुकाध्यक्ष तथा बांधकाम कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी यांनी आ. प्रकाश सोळंके यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, माजलगाव शहरात दिनांक २८ जुलै २०२५, रोजी वार्ड क्रमांक ८ मध्ये माजी नगराध्यक्ष नानाभाऊ शिंदे यांचे नियोजित कार्यक्रमात माजलगाव शहराच्या फुकटपुरा, बरकत नगर, वडार गल्ली, इंदिरानगर, आझाद नगर, कुरेशी गल्ली, तकिया मोहल्ला, मनुर रोड, महेबूबनगर, बिलाल मोहल्ला व सर्व भोगवटदार धारकांना घरकुल मिळावे या मागणी करिता माजलगाव नगर परिषद चे माजी नगराध्यक्ष नानाभाऊ शिंदे व माजलगाव समाजवादी पक्षाचे तालुकाध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी यांनी आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्याशी माजलगाव शहरातील प्रभाग क्रमांक ०८ व इतर शहरातील सर्व मुस्लिम बहुल प्रभागांच्या विकास कामे संदर्भात सविस्तर चर्चा करून तसेच अनेक वर्षापासून मागणी करत असलेले वंचित भोगवटदार लाभार्थ्यांना घरकुल ची मंजुरी देण्याचे निवेदन दिले.

निवेदन देताना माजी नगराध्यक्ष डॉ. प्रकाश आनंदगावकर, माजी नगराध्यक्ष नासर खान व राष्ट्रवादी पक्षाचे तालुकाध्यक्ष, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष तुकाराम बापू येवले, मानसे. राहुल लंगडे, मानसे अविनाश बनसोडे, मानसे सुशांत पौड, मानसे रफिक तांबोळी, शिवसेनेचे शहराध्यक्ष पापा सोळंके, मौलाना आझाद चे नुमान चाऊस, मोहसीन बागवान, पठाण अमजद जिलानी व अनेक मान्यवर सहित शेकडोंच्या संख्येंने महिलांसह अन्य नागरिकही उपस्थित होते.

## थोडक्यात



### पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्या-उदयसिंह बोराडे

जालना। प्रतिनिधी

मंठा- नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे संपूर्ण तालुक्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकऱ्यांची अनेक एकरातील उभी पिके वाहून गेली आहेत. शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी रविवार (दि.२७रोजी) तालुक्यातील रामतीर्थ गावाचा दौरा केला.नुकसानीच्या ठिकाणी पदाधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. पाहणीत अनेक ठिकाणी सोयाबीन,कापूस,तुर, मुग व इतर पिके पूर्णतः नष्ट झाल्याचे निदर्शनास आले.फक्त पिकेच नव्हे तर अनेक ठिकाणी विहिरीदेखील अतिवृष्टीमुळे ओसंडून वाहून गेल्या असून काही विहिरी पाण्याखाली जाऊन पूर्णपणे अदृश्य झाल्या आहेत. काही शेतकऱ्यांचे पीके पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले आहेत.शेतीसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा देखील धोक्यात आल्या आहेत.शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, ''ह्या अतिवृष्टीमुळे आम्ही अक्षरशः उघड्यावर आलो आहोत. नुकसान भरपाई मिळावी, अशी आमची शासनाकडे मागणी आहे.''या भागात तातडीने मदत व पुनर्वसनाची आवश्यकता असून प्रशासनाने त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अश्या सुचना उदयसिंह बोराडे यांनी प्रशासनाला केल्या.

### जिल्हास्तरीय लोकशाही दिन ०४ ऑगस्टला

बीड। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, ४ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा.लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळवले आहे.

### शासकीय तंत्र प्रशाला येथे द्विलक्षी अभ्यासक्रम प्रवेशास सुरुवात

बीड। प्रतिनिधी

येथील शासकीय तंत्र प्रशाला केंद्र तथा कनिष्ठ महाविद्यालय, बीड (शासकीय आयटीआय परिसर) येथे इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता द्विलक्षी अभ्यासक्रमातील ऐच्छिक विषय घेण्यासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. या अंतर्गत इलेक्ट्रिकल मेंटेनन्स, स्कूटर मोटर सायकल सर्व्हिसिंग व मेकानिकल मेंटेनन्स या विषयांपैकी एक विषय ऐच्छिक निवडता येतो. सदरील विषय हा एकुण २०० गुणांचा असून त्यापैकी प्रात्यक्षिक परीक्षेचे १२० गुण व थेअरी परीक्षेचे ८० गुण असतात. हे विषय इंजिनिअरींग क्षेत्रामध्ये करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त असून, यामुळे इयत्ता १२ वी परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळविणे शक्य आहे तसेच या इंजिनिअरींग ग्रुपच्या विषयामुळे त्यांना इंजिनिअरींगचे मुलभूत ज्ञान प्राप्त होते व त्याचे महत्व लक्षात येऊन आवड निर्माण होते.हे विषय घेण्यासाठी बीड तालुक्यातील कोणत्याही महाविद्यालयात इयत्ता ११ वी तील प्रवेशित विद्यार्थी विहित नमुन्यात अर्ज करु शकतात. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी शासकीय तंत्र प्रशाला केंद्र तथा कनिष्ठ महाविद्यालय, बीड (शासकीय आयटीआय परिसर) येथे संपर्क साधावा. तसेच सविस्तर माहितीसाठी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.जी.पी.गवळी, एस.महिंद्रकर, डी.टी.गायकवाड यांच्याशी असे आवाहन शासकीय तंत्र प्रशाला केंद्र तथा कनिष्ठ महाविद्यालय,मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी केले आहे.

## 'एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम' गीत-संगीताचा मोफत कार्यक्रम

बीड। प्रतिनिधी

येत्या ३१ जुलै रोजी चित्रपटसृष्टीतील अजरामर गायक मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम या गीत-संगीताच्या मोफत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक तथा गायक एम.एम.शेख आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

गीत-संगीताचा हा कार्यक्रम पीस बुक डेपो चे संचालक, गायक तथा आयोजक एम.एम.शेख दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सादर करीत आहेत. त्यांच्यासोबतच प्रियंका भंडारी, आकाश जाधव, संध्या जाधव, निशा उजगरे, शेख मझहरोद्दीन, सय्यद मुजीब हे गायक-गायिका आपली गायन कला सादर करणार आहेत. एम.एम.शेख हे गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने अजरामर पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम हा कार्यक्रम विना खंड सादर करीत आहेत. दरवर्षी या कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांची उत्स्फूर्त उपस्थिती असते. दिवसेंदिवस या कार्यक्रमाची लोकप्रियता वाढत चालली आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमात सहभागी असणारे सर्व गायक कलाकार विनामूल्य हा कार्यक्रम आयोजित करतात. आणि या कार्यक्रमाच्या माध्यमातून मरहूम मोहम्मद रफी यांना श्रद्धांजली वाहतात.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हा सदाबहार गीतांचा मोफत कार्यक्रम येत्या गुरुवार दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी बीड शहरातील जालना रोड स्थित हॉटेल हिना इंटरनॅशनल समोर, असलेल्या संग्राम हॉटेल / हॉल, जालना रोड, बीड येथे सायंकाळी ६३०: वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात बीड जिल्हा परिषदचे वरिष्ठ सहाय्यक युसूफ़ पठाण यांची विशेष उपस्थिती राहणार असून साऊंड सिस्टिम ची जबाबदारी नेहमीप्रमाणे कृष्णा पांगरे सांभाळणार आहेत. तरी रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक तथा गायक एम.एम.शेख आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

## कष्टकऱ्यांच्या पदराला सन्मानाची साडी

### अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त मन जिंकणारा उपक्रम

बीड । प्रतिनिधी

क्रांतीशील विचारवंत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात एक अत्यंत प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. कष्टकरी आणि श्रमिक महिलांच्या सन्मानार्थ आयोजित या कार्यक्रमात तब्बल पाचशे महिलांना साडी-वाटप करण्यात आले. त्यामुळे समाजात साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड शहरने एक आदर्श निर्माण करून दिला आहे.असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले.

बीड शहरात दि.२८ जुलै ते १ ऑगस्ट या कालावधीत साहित्य सम्राट गौरव महोत्सव साजरा होतो आहे. त्या अनुषंगाने सोमवार (दि.२८) रोजी चांदणे वाडा येथे साडी वाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यक्ष म्हणून डॉ.सारिकाताई क्षीरसागर, प्रेमलताताई चांदणे, जयश्रीताई विधाते, जयंतीचे मार्गदर्शक अजिंक्य चांदणे, सुभाष लोणके,अशोक सोनवणे ,केशव लोंढे,जयंती समिती सचिव सुनील पाटोळे,पोपट मिसाळ, सुधाकर धुरंदरे, आनंद चांदणे आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवर म्हणाले की, खऱ्या अर्थाने श्रमदान करणाऱ्या आणि आयुष्याची लढाई मोठ्या खंबीरपणे लढणाऱ्या महिलांच्या सन्मानार्थ हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमामागे अण्णाभाऊ साठेंच्या विचारांची प्रेरणा आहे. त्यांनी आपल्या साहित्य, गीत आणि लेखनातून श्रमिकांचे दुःख, स्वप्नं आणि संघर्ष जगासमोर मांडले. त्यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेला हा उपक्रम म्हणजे त्यांच्या कार्याला खरे अभिवादन आहे.या उपक्रमामुळे समाजात सहवेदना, सन्मान आणि सामाजिक एकतेचा संदेश पोहचवला गेला असून अण्णाभाऊंच्या विचारांनी प्रेरित झालेल्या नव्या पिढीसाठी हे एक मार्गदर्शक ठरणार आहे. असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले. दरम्यान अण्णाभाऊ साठे गौरव महोत्सवात साजऱ्या होणाऱ्या उर्वरित कार्यक्रमांना उपस्थित रहावे असे आवाहन जयंती उत्सव समितीकडून करण्यात आले आहे.



## बाजार समितीच्या पुढाकारातून शंभर क्षयरुग्णांना पोषण आहार किट वाटप

जालना। प्रतिनिधी

भारत सरकारने वर्ष २०२५ पर्यंत क्षयरोग मुक्त भारत करण्याचे उदिष्टये ठेवले असून त्याअनुषंगाने प्रधानमंत्री टिबीमुक्त भारत अभियानांतर्गत हा उपक्रम संपूर्ण भारत देशामध्ये रबविण्यात येत असून या उपक्रमांतर्गत उपचारांखाली असलेल्या व संमती दिलेल्या सर्व क्षयरुग्णांना सामाजीक संस्था, औद्योगीक संस्था व समाजातील दानशुर व्यक्ती यांनी निक्क्षय मित्र म्हणुन नोंद करुन त्यांच्यामार्फत क्षयरुग्णांना अतिरिक्त पोषण आहार किट देण्याकरीता केंद्रशासनामार्फत प्रधानमंत्री टिबीमुक्त अभियान राबविण्यात येत आहे.

त्यानुषंगाने जालना कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या पुढाकाराने जालना जिल्हयातील उपचारावर असणाऱ्या क्षयरुग्णांना १०० पोषण आहार किट वाटप कार्यक्रम नुकताच जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, व आ. श्री.अर्जुनराव खोतकर यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी बाजार समितीचे प्रशासक व सचिव श्री. अनिल खंडाळे, मनपा आयुक्त संतोष खांडेकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे तसेच शिवसेनेचे शहरप्रमुख श्री. विष्णु पाचफुले आदींची उपस्थिती होती. प्रधान मंत्री टिबी मुक्त भारत अभियान या अभियानांतर्गत कृषी उत्पन्न बाजार समिती जालना यांनी क्षयरुग्णांना कोरडा पोषण आहार किट वाटप केल्या त्यांनी बाजार समितीचे अभिनंदन केले. यावेळी डॉ. रमेश काकड ,डॉ.पी.व्ही. नागदरवाड, श्री. दादाराव बोराडे यांच्यासह उपचारावर असणारे क्षयरुग्ण तसेच श्री जी. जी. लोखंडे, श्री एस.एस. खंडागळे श्री. अशिष ओझा, श्री. एन. यु. चव्हाण डिपीएस, श्रीमती गिता चव्हाण आरोग्य पर्यवेक्षक, निखिल काळभोर, श्री. गोविंद वावरे श्री गोपाल सुरी, श्री. अभिनव श्रीमल, श्री सुबोध सुरडकर, श्री जी.व्ही. राऊत, श्री कपिल कोकरे, श्री संजय शहाणे, श्री कमलेश देशमुख यांची उपस्थिती होती.



## धारूर येथेल देवस्थान इनामी जमीन प्रकरणाला जबाबदार कोण?

### वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनी लक्ष द्यावे-सय्यद सलीम बापू

बीड । प्रतिनिधी

जिल्हाभरात देवस्थानी इनामी जमिनीची अवैध खरेदी विक्री करणारी भू माफिया टोळी सक्रिय असून या टोळी कडून महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांना हाताशी धरून अवैध प्रकारे फेरफार करून जमीन लाटण्याचे प्रकार समोर आले असून असेच काही प्रकार धारूर येथेही घडले आहे. धारूर येथे मंदिर,मस्जिद,दर्गाह,ईदगाह,अशुरखाना,कब्रीस्तान इत्यादी देवस्थानची मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळांतर्गत येणारी इनामी जमीन असून या जमिनीवर स्थानिक नेते आणि भू माफिया यांचा डोळा असून या वक्फ मंडळांतर्गत येणाऱ्या देवस्थान मालकी इनामी जमिनी वर स्थानिक नेते आणि भूमाफिया यांनी धारूर येथील तहसीलदार,मंडळाधिकारी,तलाठी व इतर महसूल कर्मचारी आणि धारूर नगरपरिषद येथील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संगणमत करून अवैध प्रकारे फेरफार व एन ए.लेआउट करून जमिनी लाटण्याचे प्रकार समोर आले आहे.

या प्रकरणावर आंबेडकरी विचार मोर्चा आणि तहरीक-ए-इनाम संघटनेच्या वतीने वेळोवेळी रिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदने देण्यात आली होती.या सर्व प्रकरणावर एक चौकशी समितीही गठित करण्यात आली होती या चौकशी समितीने काय चौकशी केली ? याचे उत्तर अध्याप आम्हाला मिळालेले नाही.पण धारूर येथील देवस्थान इनामी जमीन प्रकरण उघडकीस आणणाऱ्यांवर काही महिलांना हाताशी धरून खोटे फिर्यादी दाखल करण्याचे प्रयत्न स्थानिक नेते आणि भूमाफिया करीत आहे. या सर्व प्रकरणावर पोलीस अधीक्षक साहेब आणि धारूर येथील पोलीस निरीक्षण साहेबांनीही विशेष लक्ष देण्याचे गरजेचे आहे. धारूर येथील तहसीलदार आणि इतर महसूल अधिकारी यांच्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा कसलाही अंकुश राहिला नाही ते म्हणतील तोच कायदा अशी गत झाली आहे.धारूर येथे मोठ्या प्रमाणात देवस्थान इनामी जमिनीचे अवैध फेरफार झाले असून व त्याचप्रमाणे गायरान जमिनीचेही फेरफार व वेद खरेदी-विक्री करण्याचे प्रकरण सुद्धा समोर आली आहे. तरी धारूर येथील देवस्थान इनामी जमिनी प्रकरणाला जबाबदार कोण या ? सर्व प्रकरणावर महाराष्ट्र राज्य व मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनी लक्ष देऊन प्रकरणातील संबंधित दोषी अधिकारी कर्मचारी व भूमाफियांवर तात्काळ चौकशी करून दोषींवर वक्फ अधिनियम १९९५ कलम ५२ (१) (अ) प्रमाणे गुन्हे दाखल करावे अशी मागणी आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या पत्रकातून केली आहे.



## आगामी निवडणुकांसाठी गतीने काम करा-भुतेकर

जालना। प्रतिनिधी

शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या बदनापूर विधानसभा मतदारसंघात जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या नेतृत्वाखाली आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकींमध्ये विजयश्री खेचून आणण्यासाठी पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी गतीने कामास लागावे असे आवाहन शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर यांनी आज केले.

बदनापुर येथील शिवसेना संपर्क कार्यालयात सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ सोमवारी ( ता. २८) संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर यांच्या हस्ते आणि जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. यावेळी माजी जि. प.सदस्य कैलास चव्हाण, सुभाषराव बोडखे, उपजिल्हाप्रमुख भालचंद्र भोजने ,तालुकाप्रमुख कल्याण अवघड, तालुका संघटक भगवान मदन, युवा सेना तालुकाप्रमुख ईश्वर जुंबड, शिवसेना उप तालुकाप्रमुख माधवराव गीते ,हरिभाऊ कापसे, सिताराम गोरे, सुरेशराव घोरपडे ,अमोल दाभाडे, प्रवीण फुके, महिला आघाडीच्या तालुका संघटक छायाताई जऱ्हाड, ओबीसी आघाडीचे तालुका संघटक कैलास वैद्य , किसान सेना तालुका संघटक सखाराम क्षीरसागर, विधानसभा संघटक कैलास दुधानी, शहरप्रमुख अंबादास कोळसकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पंडितराव भुतेकर पुढे बोलतांना म्हणाले, बदनापूर मध्ये चार वेळेस शिवसेनेचा आमदार निवडून आला असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कोणत्याही क्षणी लागू शकतात, युतीचा निर्णय हा वरिष्ठ पातळीवर होईल तथापि शिवसेना पक्षाकडून उमेदवारांची चाचपणी सुरू असल्याचे भुतेकर यांनी सांगितले. कैलास चव्हाण, सुभाषराव बोडखे,कल्याण अवघड, भगवान मदन यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन विधानसभा संघटक कैलास दुधानी यांनी केले तर शहरप्रमुख अंबादास कोळसकर यांनी आभार मानले. बैठकीस विभाग प्रमुख दीपक डिघे, मनोज शिंदे, भगवान ढाकणे ,रामेश्वर नागवे, ईश्वर कवडे ,जिजा काळे ,राजेंद्र चौधरी, रामेश्वर दराडे, विलास तुपे ,संतोष ताठे, राजेभाऊ केकान, नारायण घुगे, योगेश वीर ,गणेश कडोस ,परमेश्वर कवडे यांच्यासह पदाधिकारी आणि शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आ. अर्जुनराव खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली बदनापुर तालुक्यातील शिवसैनिकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जात असून आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतींमध्ये शिवसेनेचे जास्तीत जास्त सदस्य निवडून जाण्याच्या दृष्टिकोनातून कडवट शिवसैनिकांच्या भेटी-गाठी घेऊन वीस हजार सदस्यांची नोंदणी करण्यात आली असून आता आगामी आठ दिवसात गाव पातळीवरील जुन्या- नवे कडवट पक्षाशी एकनिष्ठ असणारे २००० सक्रिय सदस्य नोंदणी असल्याचा निर्धार शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी याप्रसंगी व्यक्त केला. निवडणुकांना ताकतीनिशी सामोरे जाण्यासाठी पक्षाची तयारी असल्याचे घुगे यांनी सांगितले.



# मोफत बाल हृदय रोग शिबिरामध्ये १५४ बालकांची २ डी इको तपासणी

## २४ बालकांची होणार मुंबईत मोफत हृदय शस्त्रक्रिया, डॉ नवनाथ घुगे यांची माहिती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील घुगे हार्ट अँड क्रिटिकल केयर हॉस्पिटल अंबाजोगाई येथे डॉ नवनाथ घुगे यांच्या पुढाकारणे आय.एम.ए.अंबाजोगाई,रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी,राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम महाराष्ट्र शासन व बालाजी हॉस्पिटल,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत बाल हृदय रोग, २- डी इको व कलर डॉपलर तपासणी,बालहृदय रोग शस्त्रक्रिया शिबीर रविवार दि.२७ जुलै २५ रोजी पार पडले. या शिबिरात १५४ बाल हृदय रोग असणाऱ्या बालकांची मोफत २- डी इको व कलर डॉपलर तपासणी करण्यात आली. यामध्ये जवळपास १४० बालकांना हृदय रोग असल्याचे दिसून आले त्यापैकी २४ बालकांची हृदय शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे असे तपासणीत निदान झाले. या बालकांवर मुंबई येथील बालाजी हॉस्पिटल येथे मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. शिवाय मुलाचा व त्याच्या पालकाचा जाण्या येण्याचा खर्च सुद्धा बालाजी हॉस्पिटलच्या वतीने केला जाणार असल्याचे डॉ. नवनाथ घुगे यांनी सांगितले. या शिबिराचे फलित असे की, ग्रामीण भागातील या गोरगरीब व ऊसतोड मजुरांच्या कुटुंबातील मुलांची शस्त्रक्रिया होणार आहे.

हे शिबीर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय राऊत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ सर, डॉ सचिन शेकडे सर , निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.लक्ष्मीकांत तांदळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. शिबिराचे उदघाटन म्हणून जेष्ठ समाजसेवक व भाजपा नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर आय.एम.ए अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे, उपाध्यक्ष डॉ.राहुल धाकडे, सचिव डॉ.उद्धव शिंदे, बालाजी हॉस्पिटल, मुंबईचे सुप्रसिद्ध बाल हृदयरोग तज्ज्ञ डॉ.श्रीपाल जैन, रोटरी क्लब अंबाजोगाईच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम महाराष्ट्र शासनचे समन्वयक रमेश तांगडे, डॉ.सुधीर धर्मपात्रे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष मोहिते यांनी केले तर मंजुषा जोशी यांनी उपस्थितानाचे आभार मानले. याप्रसंगी डॉ.नवनाथ घुगे यांनी प्रास्ताविक केले व हे शिबीर आयोजित करण्यामागची भूमिका मांडली. यावेळी बोलताना डॉ.घुगे म्हणाले की,घुगे हॉस्पिटल व संपूर्ण टीम मागील २० वर्षांपासुन आय.सी. यू च्या माध्यमातून हजारो अतिगंभीर, हार्ट अटॅक, प्यारालिसिस, किडनी विकार, सर्पदंश, विषबाधा अशा अनेक गंभीर रुग्णावर यशस्वी उपचार करत आहेत. रुग्ण सेवा करत असताना सामाजिक बांधिलकी जपत वेगवेगळ्या आजाराबद्दल जनजागृती करण्यासाठी आजपर्यंत अनेक शिबिराचे आयोजन, व्याख्यान व इतर समाजपयोगी कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आपल्या परिसरातील गरीब, गरजू जन्मजात हृदय विकार असणाऱ्या बालकांसाठी मोफत २डी इको व कलर डोपलर तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर आयोजित केले गेले आहे असे सांगितले. या प्रसंगी बालाजी हॉस्पिटल मुंबई येथील सुप्रसिद्ध बाल हृदयरोग तज्ज्ञ डॉ. श्रीपाल जैन यांनी बालकांच्या हृदय रोगाबद्दल अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले व शिबिरासाठी उपस्थित असलेल्या प्रत्येक बालकाची अचूक हृदय तपासणी करून त्यांना रोग मुक्त करण्याचे आश्वस्थ केले. चे समन्वयक रमेश तांगडे यांनी महाराष्ट्र शासन यांच्या वतीने उपलब्ध योजनाची माहिती दिली व भविष्यात वेगवेगळ्या आजाराची, गरीब गरजू रुग्णासाठी शिबीरे आयोजित करणार असल्याचे सांगितले. आपल्या अध्यक्षीय समारोप्रसंगी नंदकिशोर मुंदडा यांनी डॉ.नवनाथ घुगे व घुगे हॉस्पिटल, रोटरी क्लब, आय. एम. ए. अंबाजोगाई तसेच, बालाजी हॉस्पिटल,मुंबई व डॉ श्रीपाल जैन, टीम यांचे कौतुक केले. या शिबिराच्या माध्यमातून अनेक गरीब, गरजू रुग्ण यांची हृदय रोग तपासणी व शस्त्रक्रिया मोफत होणार असून ते रुग्ण कायमस्वरूपी हृदय रोग मुक्त होणार आहेत, याबद्दल या परिसराचा प्रतिनिधी म्हणून अतिशय आनंद होतं असल्याचे सांगितले. या पुढे ही भविष्यात सर्वांच्या सहयोगाने वेगवेगळ्या आजाराबद्दल तपासणी व उपचार शिबीरे तसेच जनजागृती करण्यासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले.



# उद्योगात भरारी; अ‍ॅड.प्रकाश कवठेकर यांचा पुरस्काराने सन्मान

बीड । प्रतिनिधी

येथील तेजस ग्रुपचे चेअरमन अ‍ॅड.प्रकाश कवठेकर यांनी उद्योग व्यवसायात भरारी घेतली असून पुणे येथील केपीएम मिडियाच्या वतीने त्यांना महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार जाहिर केला होता. या पुरस्काराचा हिंजेवाडी (पुणे) येथे हॉटेल राजमुद्रा येथे दि.२७ जुलै रोजी मोठ्या थाटात वितरण सोहळा संपन्न झाला.

बीड येथील तेजस उद्योग समूहाचे चेअरमन व माजी जिल्हा परिषद सदस्य अ‍ॅड.प्रकाश कवठेकर यांना ऑक्सीतेज मिनरल वॉटर या ब्रँड साठी हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तेजस बेवरेजेस या कंपनीच्या अंतर्गत ऑक्सितेज मिनरल वॉटर मार्केटिंग प्रोडक्शन क्व ालिटी हे या कंपनी ने जपले आहे. सर्वसामान्य कुटुंबामध्ये येऊन बीड जिल्ह्यामध्ये स्वत:चा ब्रँड निर्माण करण्याचे काम त्यांनी केले असून तेजस इलेक्ट्रिकल अँड सप्लायर्स, तेजस बेवरेजेस, तेजस इंडस्ट्रीज, तेजस अर्बन, तेजस अर्बन मल्टिनिधी, राजनंदनी अर्थमूव्हर्स इत्यादी कंपनी स्थापन करून शेकडो तरुणांना रोजगार उपलब्ध केला आहे. ही कंपनी ग्रामीण भागात उभा करून शेकडो मुलांना रोजगार उपलब्ध केलेला आहे. हा पुरस्कार सिने अभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्या हस्ते अ‍ॅड.प्रकाश कवठेकर यांना देण्यात आला. यावेळी उद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. अ‍ॅड.कवठेकर यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे.



# गायकवाडी येथे आजपासुन अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

पिंपळवंडी । प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या पाटोदा तालुक्यातील गायकवाडी येथे या वर्षीपासून श्रावण मासानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे दि.३०/०७/२०२५ ते दि.०६/०८/२०२५ दरम्यान आयोजन केले असून या कार्यक्रमास आज बुधवार दि.३०/०७/२०२५ पासून सुरुवात होत असून या भव्य-दिव्य सोहळयाचा पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घ्यावा,असे आवाहन समस्त गावकरी व भजनी मंडळ गायकवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे. यानिमित्त या ठिकाणी दैनंदिन काकडा आरती,ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन,भोजन,भावार्थ रामायण, हरिपाठ रात्री ९ ते ११ किर्तनाचे कार्यक्रम संपन्न होणार आहेत.या सप्ताह सोहळ्याची सांगता दि. ०६/०८/२०२५ बुधवार रोजी ह.भ.प. संतोष महाराज मोरे (आळंदी) यांचे अमृततुल्य किर्तन व नंतर महाप्रसाद पंक्तीने होईल.

# खड्ड्यांना नाव दिल्याने आमदार अस्वस्थ, धानोरा रोडवरील डांबरीकरण अजूनही रखडलेले

**बीड । प्रतिनिधी**

धानोरा रोड या रस्त्याचे डांबरीकरण व्हावे, यासाठी मागील दहा वर्षांपासून शासनाशी सातत्याने पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला जात आहे. मात्र, अद्यापही हा प्रश्न मार्गी लागलेला नाही.

या रस्त्याचे भूसंपादन अद्याप पूर्ण झालेले नसल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी कामास विरोध दर्शविला आहे. तसेच, भूसंपादनासंदर्भातील वाद मा. उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर येथे प्रलंबित असल्याने प्रशासनाकडून दुरुस्तीच्या कामाची कोणतीही जबाबदारी घेतली जात नाही.

सर्वसामान्य जनतेचा त्रास टाळण्यासाठी भूसंपादन मावेजा योग्यवेळी देण्यात येईलच, परंतु त्या आधारे रस्त्याचे डांबरीकरण थांबवणे योग्य नाही. त्यामुळे पोलिस बंदोबस्तात तातडीने काम सुरू करण्यात यावे, यासाठी वंचित बहुजन आघाडी सातत्याने मागणी करत आहे. स्थानिक नागरिकांनी आंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावर खड्ड्यांना खासदार, आमदार आणि अधिकाऱ्यांची नावे दिली. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या आमदारांनी स्वतः लोटांगण आंदोलनस्थळी येऊन परिस्थितीची पाहणी केली. मात्र, या भेटीनंतरही प्रत्यक्षात रस्त्याच्या कामात कोणताही प्रगती झालेली नाही. जर येत्या आठ ते पंधरा दिवसांत डांबरीकरणाचे काम सुरू झाले नाही, तर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी दिला आहे.

# अंबाजोगाईत अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या शासकीय निवासमधून चंदनाचे झाड चोरीला!

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात असलेल्या अपर जिल्हाधिकारी निवासस्थानातून चंदनाचे झाड चोरीला गेल्याची घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

सध्या अश्विनी जिरंगे या अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी असून मागील तीन महिन्यापासून त्या स्वाराती वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील शासकीय निवासस्थानी आपल्या कुटुंबासह राहतात. दि. २३ जुलै २०२५ रोजी रात्री साधारणतः ३ वाजता त्यांच्या शासकीय निवासस्थानाच्या आवारातील अंदाजे ३००० रुपये किमतीचे चंदनाचे छोटे झाड अज्ञात चोरट्याने चोरून नेले. या चोरीची फिर्याद अश्विनी जिरंगे यांनी दिनांक २५ जुलै रोजी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून कलम ३०३(२) अन्वये भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कांदे यांच्या कडे सोपविण्यात आला असून, शहरातल्या सुरक्षित समजल्या जाणाऱ्या शासकीय वसाहतीत घडलेल्या या चोरीमुळे नागरिकांत चिंतेचे वातावरण पसरले आहे. पोलीस अज्ञात चोरट्याचा शोध घेत आहेत.



# डॉक्टर दत्ता नलावडे डिलीट पदवीने सन्मानित

बीड । प्रतिनिधी

पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ वृंदावन धाम मथुरा उत्तर प्रदेश या विद्यापीठाद्वारे बीड येथील शिक्षण सामाजिक व मुलांच्या क्षेत्रात काम करणारे डॉक्टर दत्तात्रय साहेबराव नलावडे यांना यावर्षी विद्यापीठाच्या वतीने डि .लीट डॉक्टरेट पदवी दिनांक २७ रोजी नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आली. नलावडे यांनी गेल्या अनेक वर्षापासून बालक व त्यांच्या हक्क शिक्षण सामाजिक क्षेत्रात भरीव काम केलेले आहे तसे त्यांचे काही पुस्तकही प्रसिद्ध आहेत.

गेल्या अनेक वर्षांच्या सामाजिक ,शैक्षणिक व साहित्यिक कामाचा विचार करून विद्यापीठाने त्यांना डि .लीट पदवी देऊन गौरन्वीत करण्यात आले.कार्यक्रमाचे संयोजक कुलपती डॉ. इंदूभूषण मिश्रा तसेच या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी पद्मश्री डॉक्टर अरविंद कुमार ,पूर्व कुलपती राणी लक्ष्मीबाई केंद्रीय कृषी विद्यालय झाशी तसेच अतिथी माननीय डॉक्टर सुवर्णलता पांचाळ रिसर्च सायंटिस्ट अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान नई दिल्ली तसेच मुख्य वक्ता माननीय दीपा मिश्राजी ,प्रसिद्ध व्याख्याता तसेच विशेष अतिथी माननीय डॉक्टर विश्वनाथ पाणीग्रहणजी राष्ट्रीय पर्यावरण व वर्ल्ड रेकॉर्डधारी छत्तीसगड इत्यादी मान्यवर यांच्या उपस्थितीत पदवी समारंभ समारंभ झाला.यावेळी सन्मान पत्र देऊन डॉक्टर दत्ता नलावडे यांना ही पदवी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली .

हा कार्यक्रम दिल्ली येथे हॉटेल रेडिसन ब्ल्यू येथे संपन्न झाला .

नलावडे सरांनी त्याचे शिक्षण दीनदयाल शोध संस्थान संचलित डोमरी गुरुकुल येथे सुदाम काका भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली बारा वर्षे शिक्षण घेतलेले आहे. परमपूजनीय भारतरत्न नानाजी देशमुख ,के .डी .जोशी ,डॉक्टर सुभाष जोशी ,डॉक्टर पि .के कुलकर्णी दादा , जाहीर दादा पाटील या सर्वांच्या सानिध्यामुळे नलावडे सरांना सुरवातीपासूनच पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या गोष्टी ऐकण्याचा व परमपूज्य नानाजींच्या सानिध्यात व सुदाम काका यांच्या सहवासात राहण्याचा योग आला. आज हा सन्मान सुद्धा पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ यांच्याकडून देण्यात येत आहे .



# मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

फुलसांगवी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व वातावरण बदल तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपाचे नेते अर्जुन (बाप्पा )खेडकर यांच्यावतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला आहे.

मातोरी गटातील सर्वपरिचित असलेले व राजकीय आणि सामाजिक क्षेत्रामध्ये अग्रस्थानी असणारे अर्जुन बाप्पा खेडकर हे गेल्या अनेक वर्षापासून आपल्या नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त काही ना काही तरी वेगवेगळे उपक्रम घेऊन पंकजाताईचा वाढदिवस साजरा करत असतात. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी अर्जुन बप्पा खेडकर मित्र मंडळाच्या वतीने फुलसांगवी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून मोठे योगदान दिले आहे. आपल्या नेत्याच्या वाढदिवसाला आणा ठाई खर्च करण्यापेक्षा गोरगरिबांच्या मुलांना हातभार लागावा या उद्देशातून त्यांनी हा उपक्रम हाती घेऊन सोमवारी फुलसांगवी येथील शाळेमध्ये मान्यवरांच्या तथा मित्र मंडळाच्या उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून आदर्श निर्माण केला आहे. यावेळी पान ३ वर



# सव्वा तीन किलो चांदी व अंबडची कार जप्त

## घरफोडीचे पाच गुन्हे उघड; स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

जालना । प्रतिनिधी

घनसावंगी हद्दीतील कुंभारपिपळगाव येथील ज्ञानेश्वर दहीवाळ यांचे ज्ञानेश्वरी ज्वैलर्स येथे २३ जुलै रोजी दुकानाच्या चॅनेल गेटचे व शटरचे कुलूप तोडुन दुकानात प्रवेश करुन चार अज्ञान ईसमांनी त्यांचे दुनाकातून १९,७६,५०० रुपयाचे सोने चांदीचे दागिने चोरुन नेले वरुन चार अज्ञात ईसमां विरुद्ध पोलीस ठाणे घनसावंगी गुरनं. ३९२/२०२५ कलम ३३१(४),३०५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल झालेला होता.

गुन्हा उघडकीस करण्यासाठी मा. पोलीस अधिक्षक अजय कुमार बंसल यांनी या बाबत आदेश दिल्याने तसेच सदर गुन्हयाचा तपास चालु असतांना दिनांक २९/०७/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा यांना माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा शक्तीसिंग उर्फ शक्तीमान प्रल्हादसिग टाक वय २२ वर्ष रा. गुरुगोविंदसिंग नगर जालना याने त्याचे तीन साथीदारासह केला असल्याची माहिती मिळाल्याने त्यास ताब्यात घेऊन गुन्हयाचे संबंधाने विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली देऊन त्याचे कडून गुन्हयातील ५,६७,८२० रु किमतीचे सोन्या चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहे. तसेच रविंद्र कारके रा. पाचोड रोड अंबड यांनी पोलीस ठाणे अंबड येथे फिर्याद दिली होती की, त्यांची १,५०,०००/- रु किमतीची मारुती सुझुकी कंपनीची अल्टो पान ३ वर



# उर्दू, मराठी शाळांजवळच नगर परिषदेचा कचरा डेपो

## दिडशे विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका; राष्ट्रवादी काँग्रेसचा (एसपी) आंदोलनाचा इशारा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील गुरुवार पेठ गवळीपुरा भागातील जिल्हा परिषदेच्या मराठी व पीएम श्री उर्दू शाळांजवळ नगर परिषदेकडून कचऱ्याचे डंपिंग करण्यात येत असून त्यामुळे शाळकरी विद्यार्थी, शिक्षक आणि स्थानिक नागरिक यांच्या आरोग्यावर गंभीर धोका निर्माण झाला आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे नेते डॉ. नरेंद्र काळे आणि अ‍ॅड. इस्माईल गवळी यांनी नगर परिषदेला निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.



सदर शाळांमध्ये एकूण १६२ विद्यार्थी शिक्षण घेत असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणासमोरच कचऱ्याचे ढीग दिवसेंदिवस वाढत आहेत. या भागात ध्वजारोहणाचे कार्यक्रमही घेतले जातात. मात्र या शाळांच्या परिसरातच कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ मरण पावलेले जनावर आढळल्यामुळे संतापाची लाट उसळली आहे. शाळा प्रशासनाने यापूर्वी अनेक वेळा नगर परिषदेकडे तक्रार करूनही काहीही ठोस कारवाई झाली नसल्याची

पान ३ वर

# अंबाजोगाई ते सेलूअंबा रस्ता खचला

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरापासून तथागत चौक मार्गे सेलूअंबा गावाकडे जाणाऱ्या एका वळणावर रस्ता खचला असून सदरील रस्त्यावरून खबरदारी घेण्याची गरज आहे.

थोडक्यात माहिती अशी की,तथागत चौकापासून पोखरी गाव आणि सेलूअंबा कडे ग्रामीण भागातील लोकांची मोठ्या प्रमाणात ये-जा होत आहे.याच रस्त्यावरून लातूर कडे जाणारा मधला मार्ग म्हणून दुचाकी,चारचाकी वाहन धारकांची टोल नाका वाचवण्यासाठी या रस्त्यावर मोठी वर्दळ सूरू आहे.मात्र पोखरी गावाकडे जाणाऱ्या हद्दीतील रस्त्यावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडून रस्त्याची चाळणी झाली आहे.यामुळे पिताजी सारडा नगरी च्या पाठीमागून जाणाऱ्या सेलूअंबा रस्त्याचा पर्याय लोकांनी निवडला असून मात्र चार दिवसापूर्वी झालेल्या पावसाने जोगाई वाडी,सेलू अंबाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या बाजूला असलेल्या शेतातील सखल भागात पाणी जमा झाले आहे.तर याच रस्त्यावर एका वळणावर पुलानजीक डांबरी रस्ता खचला आहे.पुलाखालून छोटी नदी वाहते. याठिकाणीच भूसखलन सारखा प्रकार घडला असून हा अर्धा रस्ता खचला आहे.त्यामुळे सदरील रस्ता रहदारीस धोकादायक झाला असून वाहनधारकांनी येथून ये-जा करताना सावधगिरी बाळगली पाहिजे.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

बुधवार, दि.३० जुलै २०२५ । पान ७

# रोहिणी खडसे वकिलीचा कोट घालून न्यायालयात हजर

## खेवलकरांना अडकवण्यासाठी ईशा सिंगचा वापर, विजयसिंह ठोंबरेंचा युक्तिवाद

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील एका रुममध्ये सुरु असलेल्या पार्टीवर पोलिसांनी छापा टाकत सात जणांना अटक केली होती. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विधानपरिषदेचे आमदार एकनाथ खडसे यांचे जावई आणि महिला आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांचे पती डॉ. प्रांजल खेवलकर यांचा समावेश होता. पुणे पोलिसांनी ही कारवाई २७ जुलै रोजी केली होती. आज त्या सर्वांची पोलीस कोठडी संपत असल्यानं सर्व आरोपींना पुणे सत्र न्यायालयात हजर करण्यात आलं आहे. रोहिणी खडसे या ठिकाणी स्वत: पोलिसाचा कोट घालून न्यायालयात आल्या आहेत. पुणे पोलिसांनी आरोपींची पोलीस कोठडी वाढवण्याची मागणी केली. तर, प्रांजल खेवलकरांचे





वकील विजयसिंह ठोंबरे यांनी खेवलकर यांना अडकवण्यासाठी ईशा सिंगचा वापर केल्याचा युक्तिवाद केला आहे.

प्रांजल खेवलकर यांच्यासह सात आरोपींना पोलीस कोठडी संपल्याने पुणे सत्र न्यायालयात हजर करण्यात हजर करण्यात आलं आहे. या सुनावणीसाठी रोहिणी खडसे या स्वत: वकिलीचा कोट घालून न्यायालयात आल्या आहेत. त्या पती प्रांजल खेवलकर यांच्यासाठी न्यायालयात वकील म्हणून युक्तीवाद करण्याची शक्यता आहे. रोहिणी खडसे यांच्याकडे वकिलीची सनद आहे. रोहिणी खडसे यांच्या सोबत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रुपाली पाटील देखील वकिलीचा काळा कोट घालून युक्तिवाद करण्यासाठी न्यायालयात आल्या. तपास अधिकारी यांनी न्यायालयात सादर केलेल्या माहितीप्रमाणे तपासात राहुल नावाचा नवीन व्यक्ती असल्याची माहिती मिळाली आहे. तो हुक्का भरण्याच काम करत होता. त्याचा शोध घ्यायचा आहे. अंमली पदार्थ कोठून आणले याबाबत आरोपी एकमेकांकडे बोट दाखवत आहेत. त्यासाठी त्यांच्याकडे चौकशी करायची आहे. सातपैकी अटक असलेल्या दोन महिला आरोपींची पोलीस कोठडी सध्या गरजेची नाही. या दोन महिला आरोपींना न्यायालयीन कोठडी देण्यात यावी. मात्र, पाच पुरुष आरोपींकडे आणखी चौकशी करायची असल्याने त्यांची पोलीस कोठडी मिळावी. आरोपींकडून इलेक्ट्रॉनिक गॅझेटस जप्त करण्यात आली आहेत. त्यासाठी आरोपींची पोलीस कोठडी मिळावी.

### प्रांजल खेवलकरांनी अंमली पदार्थाचं सेवन केलं नाही – विजयसिंह ठोंबरे

प्रांजल खेवलकरांकडून वकील विजयसिंह ठोंबरे यांनी युक्तिवाद केला. ते म्हणाले की दोन महिला आरोपींकडे अंमली पदार्थ देऊन प्रांजल खेवलकर यांना अडकवण्यात आले आहे. इशा सिंग हिच्या पर्समधे सिगारेटच्या रिकाम्या पाकीटात कोकेन सापडले आहे. इशा सिंगला प्लांट करण्यात आले होते. पोलीस आता त्या दोन महिला आरोपींना पोलीस न्यायालयीन कोठडीची मागणी करतायत आणि प्रांजल खेवलकर यांची मात्र पोलीस कोठडी मागतायत. प्रांजल खेवलकर यांनी अंमली पदार्थांच सेवन केलेले नाही आणि त्यांच्याकडे अंमली पदार्थ सापडलेले देखील नाहीत. अंमली पदार्थांचा फॉरेन्सीक रिपोर्ट मुद्दामहुन लवकर येत नाही.

# श्री विठ्ठल मंदिर संस्थानतर्फे दिंडी प्रमुखांचा सत्कार



तळेगाव दाभाडे । प्रतिनिधी

पंढरपूरकडे पायी वारी करणाऱ्या मावळ तालुक्यातील २४ दिंडी प्रमुख व विणेकरांचा श्री विठ्ठल मंदिर संस्थानतर्फे सत्कार करण्यात आला. संस्थानचे अध्यक्ष व माजी मंत्री बाळा भेगडे यांच्या अध्यक्षतेखाली व विश्वस्त बाळकृष्ण आरडे यांच्या उपस्थितीत हा सत्कार सोहळा संपन्न झाला.

अध्यक्ष संजय भेगडे यांनी श्री विठ्ठल मंदिराचा गौरवशाली इतिहास आणि मंदिराच्या सेवाभावी वाटचालीबाबत सविस्तर माहिती दिली. या प्रसंगी ह.भ.प. महादू सातकर, उत्तमराव बोडके, काशिनाथ ढोरे, माऊली मराठे, कोंडीबा दिवेकर, महेश सोनपावले यांसारख्या अनेक मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त करत दिंडी परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी श्री विठ्ठल मंदिर संस्थानचे यतीन शहा, नित्योपचार समितीचे अध्यक्ष हरिदास वनारसे, कार्याध्यक्ष देवराम महाराज खराटे, उपाध्यक्षा सीमा शेलार,सीमा कुलकर्णी, मुरलीधर ढेकणे, काशिनाथ निंबळे, निवृत्ती फाकटकर,अरविंद पाटील, सोनबा गोपाळे सह तालुक्यातील वारकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत श्याम भेगडे यांनी केले. प्रास्ताविक ह.भ.प. नथुराम महाराज जगताप पाटील यांनी केले. सुत्रसंचालन दिनेश दरेकर व नारायण धामणकर यांनी तर आभार विलास गायकवाड यांनी केले.

# बुधवार पेठेतील कुंटणखाना तीन वर्षांसाठी सील

**पुणे । प्रतिनिधी**

**पुणे शहरातील बुधवार पेठ भागात असलेल्या एका कुंटणखान्यात बांग्लादेशी अल्पवयीन मुलीकडून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करवून घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. या प्रकरणात फरासखाना पोलिसांनी दोघांना अटक केली असून, संबंधित कुंटणखाना तीन वर्षांसाठी सील करण्यात आला आहे.**

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या नो टॉलरन्स धोरणाअंतर्गत करण्यात आली आहे. याप्रकरणी फरासखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.फरासखाना पोलिसांनी मिळालेल्या माहितीनुसार, या आरोपींनी बांग्लादेशी अल्पवयीन मुलीला फसवून व जबरदस्तीने वेश्याव्यवसायात ढकलले होते. यासंदर्भात चौकशी आणि पुरावे प्राप्त झाल्यानंतर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत भस्मे यांनी

### नो टॉलरन्स धोरणाअंतर्गत पोलीस आयुक्तांची कारवाई

संबंधित ठिकाणावर कारवाईचा प्रस्ताव पोलीस आयुक्तांकडे सादर केला होता.या प्रस्तावाची सुनावणी करून पोलीस आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी अमितेश कुमार यांनी कुंटणखान्यावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक अधिनियम १९५६ चे कलम १८(१)(अ) अंतर्गत तीन वर्षांसाठी सील करण्याचे आदेश दिले.त्यानुसार दिनांक २८ जुलै २०२५ रोजी दोन पंचासमक्ष फ्लॅट नं. १८/ए, तिसरा मजला, नवीन बिल्डिंग, बुधवार पेठ येथील कुंटणखाना सीलबंद करण्यात आला.ही कारवाई सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, उपआयुक्त कृषिकेश रावले, आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अनुजा देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# चिनी नागरिकाच्या संपर्कात राहून आखला फसवणुकीचा प्लान; पुण्यातील चित्रपट निर्मात्याला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

पिंपरी । प्रतिनिधी

राज्यात फसवणुकीच्या घटना प्रचंड वाढत आहेत. चोरटे वेगवेगळे आमिष दाखवून नागरिकांची लाखो रुपयांची लूट करत आहेत. अशातच आता फसवणुकीसंदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. पिंपरी-चिंचवडच्या सायबर गुन्हे शाखेने एक मोठी कारवाई केली आहे. चायनीज नागरिकाच्या संपर्कात राहून सायबर फसवणुकीसाठी आपले बँक खाते पुरवणाऱ्या चित्रपट निर्मात्याला पिंपरी-चिंचवडच्या सायबर गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणात ८६ लाखांपेक्षा अधिक रुपयांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे. तसेच आणखी अनेकांची फसवणूक झाली असल्याची शक्यता आहे. त्यानुसार पोलीस तपास करत आहेत.



फिर्यादी यांनी युट्युबवर शेअर केलेल्या स्टॉक मार्केट संदर्भातील व्हिडीओखालील व्हॉट्सॲप लिंकवरून गुंतवणुकीचे आमिष दाखवणाऱ्या ॲबॉट वेल्थ नावाच्या ॲपवर नोंदणी केली होती. सुरुवातीला ५०० रुपयांची गुंतवणूक करून त्यांना काही दिवसांत ५ कोटी १५ लाखांचे प्रॉफिट असल्याचे दाखवण्यात आले. पण पैसे काढण्याचा प्रयत्न करताच विविध चार्जेसच्या नावाखाली पैशांची मागणी होऊ लागली. त्यावरून संशय बळावल्यानंतर त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात ५७,७०,६७० रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार दाखल केली. तपासादरम्यान आरोपीने वापरलेले आईडीएफसी बँकेतील खाते हे बालाजी इंटरप्रायझेस या नावाने सुरू करण्यात आले होते. पोलीस उपनिरीक्षक सागर गोमन आणि त्यांच्या पथकाने डेक्कन पोलीस ठाण्याच्या मदतीने आरोपीचा शोध घेतला. सुरुवातीला तो मी चित्रपट निर्माता आहे, अशा गोष्टी कशा करीन? असे उत्तर देत होता. मात्र पोलीस निरीक्षक प्रविण स्वामी यांनी विश्वासात घेऊन केलेल्या सखोल तपासात त्याने चायनीज आरोपींच्या सांगण्यानुसार खाते उघडले व फसवणुकीसाठी वापरले, हे कबूल केले. आरोपीच्या खात्यावर एकूण ८६,४३,१११ रुपये जमा झाले होते आणि त्या खात्यावर १५ पेक्षा जास्त फसवणुकीच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. आरोपीच्या मोबाईलमध्ये आणखी दोन बँक खाती फसवणुकीसाठी तयार केल्याचे पुरावे मिळाले आहेत. वेळीच अटक केल्यामुळे इतर अनेक लोकांची फसवणूक टळली, असे पोलीसांनी सांगितले. आरोपीकडून २ मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून, बँक खात्याची माहिती तपासणीसाठी घेतली आहे. तसेच चायनीज नागरिक बाम्बिनी आणि इतर सहआरोपींचा शोध सुरू आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे हे करत आहेत.

# सेवा निर्देशांकात पुणे विमानतळाची झेप

पुणे । प्रतिनिधी

भारतीय विमानतळ प्राधिकरण व एसीआय-एएसक्यू' (एअरपोर्ट कौन्सिल इंटरनॅशनल एअरपोर्ट सर्व्हिस क्वॉलिटी) यांनी एप्रिल ते जून दरम्यान केलेला सर्वेक्षण अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. त्यामध्ये सेवा गुणवत्ता निर्देशांकात मागील तीन महिन्यांपूर्वी ५९ व्या स्थानावर असलेले पुणे विमानतळ ५७ व्या स्थानी पोहोचले आहे.



लोहगाव पुणे विमानतळावर नवीन टर्मिनल सुरू झाले. त्यामुळे प्रवाशांची गर्दी वाढली, तसेच विमान उड्डाणांची संख्याही वाढली. देशांतील व्यस्त विमानतळामध्ये पुणे विमानतळाचा समावेश आहे. दुसरीकडे प्रवाशांना सेवा देण्यामध्ये विमानतळावर सुधारणा होत असून, त्याचा फायदा प्रवाशांना होत आहे. विमानतळावर प्रवाशांना मिळणाऱ्या सोयीसुविधांवर आधारित हे सर्वेक्षण होते. सर्वेक्षणात स्वच्छतागृहाची स्थिती, गेटवर लागणारा वेळ, विमान, रेस्टॉरंट आणि शॉपिंग मॉलमधील कर्मचाऱ्यांकडून मिळणारी वागणूक, टर्मिनलमधील स्वच्छता, चेक इन व सिक्युरिटी काउंटरमध्ये प्रवाशांना मिळणारी सेवा यांसह अन्य २६ निकषांद्वारे गुणवत्ता तपासली जाते. प्रवाशांची मते जाणून घेतली जातात. त्यानुसार गेल्या तीन महिन्यांत प्रवाशांच्या सेवेंबाबत सुधारणा झाल्याने सेवा गुणवत्तेत विमानतळाने ५७ वे स्थान मिळवले.

# खडकवासला धरण परिसरातील अतिक्रमण हटविणार : जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

पुणे । प्रतिनिधी

राज्याच्या जलसंपदा विभागाच्या कालवा, नद्या आणि धरण क्षेत्राच्या सीमारेषांलगत मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बंगल्यांचे, घरांचे तसेच हॉटेल-रेस्टॉरंटचे बांधकाम झाले असून त्यांचे सांडपाणी थेट धरणात मिसळत आहे. यामुळे जलस्रोत दूषित होत आहेत. यावर उपाय म्हणून जलसंपदा विभागाने ड्रोनच्या साहाय्याने सर्वेक्षण करून अतिक्रमण हटवण्याची मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.



सोमवारी महापालिकेत झालेल्या जलवापराच्या आढावा बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, हेमंत रासने, बापूसाहेब पठारे, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पुणे महापालिका आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. तसेच जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.विखे पाटील म्हणाले, खडकवासला धरण परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे.हॉटेल्स व रेस्टॉरंट्समधून थेट सांडपाणी धरणात सोडले जात असल्याने पाण्याची गुणवत्ता धोक्यात आली आहे. त्यामुळे धरण आणि कालवा क्षेत्रातील अतिक्रमण तातडीने हटवण्याची आवश्यकता आहे. यासाठी सर्वप्रथम ड्रोनच्या माध्यमातून संपूर्ण परिसराचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्यानंतर जलसंधारण विभागाकडून अचूक सीमारेषा मोजण्यात येतील आणि महानगर पालिका तसेच संबंधित यंत्रणांच्या सहकार्याने अतिक्रमण हटविण्याची कारवाई हाती घेतली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये जिल्हा व सत्र न्यायालयासह वरिष्ठस्तर दिवाणी न्यायालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी

**मुंबई । प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच वरिष्ठस्तर दिवाणी न्यायालय स्थापन करण्यास राज्य मंत्रीमंडळाने आज मान्यता दिली आहे. पिंपरी-चिंचवडकरांसाठी दिलासादायक आणि ऐतिहासिक ठरणाऱ्या या निर्णयाला आज मूर्त स्वरूप मिळाले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे.**



उद्योग नगरी म्हणून ख्याती असणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहरांच्या विकासात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मोठे योगदान आहे. या उद्योग नगरीचा विस्तार सातत्याने वाढत आहे. येथील नागरिकांना आपल्या फौजदारी आणि दिवाणी प्रकरणांसाठी पुणे येथील न्यायालयांपर्यंत धाव घ्यावी लागत होती.

सोळा किलोमीटर अंतर, वाढलेली लोकसंख्या, वाहतुक कोंडी, औद्योगिकीकरण आणि सतत न्यायालयीन वाढत्या प्रकरणांची संख्या पाहता, स्थानिक न्यायालयांची गरज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अनेक वेळा अधोरेखित केली होती.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत पिंपरी-चिंचवडमध्ये जिल्हा व सत्र न्यायालयासह वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन करण्यास मंत्रीमंडळाची मंजुरी मिळाली आहे.या पाठपुराव्याचा परिणाम म्हणजेच २६ पदांसह जिल्हा व अतिरीक्त सत्र न्यायालय, २४ पदांसह वरिष्ठस्तरीय दिवाणी न्यायालय व चार पदांसह शासकीय अभियोक्ता कार्यालयासाठी एकूण ५४ नवीन पदांना मान्यता देण्यात आली असून, चार कोटी तीस लाख रुपये वार्षिक आवर्ती खर्च आणि ६८ लाख रुपये अनावर्ती खर्च, असे एकूण मिळून चार कोटी ९८ लाख रुपयांच्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

सध्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतीत कनिष्ठ न्यायालये कार्यरत असून, त्याच ठिकाणी प्रस्तावित न्यायालयांसाठी कक्ष उपलब्ध करून दिले जाणार आहेत. न्यायाधीशांच्या निवासासाठी अजमेरा शासकीय वसाहत, पिंपरी येथील १९ रिक्त घरांचा वापर होणार आहे.

पिंपरी-चिंचवडसारख्या वेगाने विकसित होणाऱ्या महापालिकेला स्वतंत्र जिल्हा व सत्र न्यायालयाची नितांत गरज होती. नागरिकांना आता पुण्याला न जाता स्थानिक न्यायालयांतूनच न्याय मिळेल, याचा अत्यंत आनंद आहे. अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली आहे.

# ओव्हरलोड वाहनांवर बारामती पोलिसांची मोठी कारवाई; भीषण अपघातानंतर पोलीस यंत्रणा ॲक्शन मोडवर

**बारामती । प्रतिनिधी**

**रविवारी बारामतीमध्ये डंपरखाली येऊन वडील आणि दोन मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाला. यामुळे बारामतीमध्ये हळहळ व्यक्त करण्यात आली. यानंतर आता पोलीस यंत्रणा कामाला लागली आहे. बारामती शहर व परिसरात ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या ट्रक आणि हायवा वाहनांवर अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड आणि बारामती वाहतूक शाखेचे निरीक्षक चंद्रशेखर यादव शहर पोलिस निरीक्षक विलास नाळे यांना सोबत घेऊन मोठी कारवाई करत एकूण १४ वाहने जप्त केली आहेत. या सर्व वाहनांवर खटले तयार करून ते प्रादेशिक परिवहन अधिकारी, बारामती यांच्याकडे पाठविण्यात आली असल्याची माहिती चंद्रशेखर यादव यांनी दिली.**



बारामती शहरातील खंडोबा नगर या ठिकाणी रविवारी झालेल्या भीषण अपघातात वडीलांसह दोन चिमुकल्या मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने बारामती परिसरातील बेफिकीरपणे अवजड वाहने चालवणाऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर आला होता. या संदर्भात समाज माध्यमांवर देखील तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत होत्या. या पार्श्वभूमीवर ही कारवाई महत्त्वाची मानली जात असून या कारवाईचे स्वागत बारामती शहरातील नागरिकांनी केले आहे. बारामती परिसरात मोठ्या प्रमाणावर खडी, मुरूम व इतर बांधकाम साहित्याची वाहतूक ट्रकमधून होत असते. मात्र, या वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक वजन भरले जात असल्याने रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, तसेच अपघात ही होत आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करत पोलिसांनी ही कठोर कारवाई केली आहे. जप्त केलेली वाहने २ ते १० टनांपर्यंत ओव्हरलोड आढळून आली आहेत. यामध्ये प्रत्येक वाहनावर मोठा दंड होण्याची शक्यता आहे. सर्व वाहने बारामती वाहतूक शाखेच्या कार्यालयात ठेवण्यात आली आहेत. पोलीस प्रशासनाने सर्व वाहनचालकांना याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले असून, यापुढेही अशाच प्रकारची कारवाई सातत्याने राबवली जाणार असल्याचा इशारा दिला आहे. पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड, पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, विलास नाळे तसेच बारामती वाहतूक शाखेचे सुभाष काळे, प्रदीप काळे, माया निगडे, रूपाली जमदाडे, प्रज्योत चव्हाण, बारामती पोलिस स्टेशन चे ओंकार सीताप, स्वाती काजळे, अजिंक्य कदम यांनी केली आहे. याबाबत अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार म्हणाले की, 'गेली अनेक महिन्यापासून बारामती वाहतूक शाखा वाहतुकीचे नियम रुजवण्यासाठी कारवाया करत आहे. तरीही अपघातात मृत्युमुखी पडणेचे प्रमाण चिंताजनक आहे.नागरिकांनी , वाहनचालकांनी सजग राहून वाहतुकीच्या नियमाचे पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले. उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड म्हणाले की, काही वाहन चालक नियम मोडून नियम ओव्हरलोड वाहने चालवतात. यामुळे शाळेतील विद्यार्थी, वृद्ध, ग्रामस्थांना धोका निर्माण होतो.वाहतुकीत शिस्त आणि सुरक्षितता यासाठीच मोहीम राबवली जात आहे.' अशी माहिती राठोड यांनी दिली.

# बहिणभावास बेदम मारहाण; शिरुर तालुक्यातील धक्कादायक घटना, दोन जणांविरोधात गुन्हा दाखल

**शिरूर । प्रतिनिधी**

**शिरूर तालुक्यातील शास्ताबाद-मलठण रस्त्यावर वाहतूक रस्त्यावरील वादातून एका महिलेसह तिच्या भावास बेदम मारहाण करण्यात आली. यावेळी संबंधित महिलेस विनयभंगासह शिवीगाळ करण्यात आल्याची तक्रार दाखल झाली असून, याप्रकरणी दोघांविरोधात शिरूर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

प्राप्त माहितीनुसार, प्राजक्ता बापूसाहेब गोरडे (वय २७, रा. शास्ताबाद, ता. शिरूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दिनांक २८जुलै रोजी दुपारी ५ वाजण्याच्या सुमारास त्या व त्यांचे चुलत भाऊ संजय गोरडे हे मारुती स्विफ्ट कारने मलटणकडे जात असताना लाखेवाडी येथील पडळवळ मळा येथे टाटा टिगोर या कारने समोरून येत अडवले.वादविवाद सुरू झाल्यानंतर टाटा टिगोर कार चालक राजेंद्र तळवले याने रस्ता न देता शिवीगाळ केली.यावेळी मोटारसायकलवरून आलेल्या संकेत संतोष ननवरे (रा. कान्हूर मेसाई) याने गोरडे बंधूंवर हात उचलला. संजय गोरडे यास खाली पाडून लाथाबुक्यांनी मारहाण केली. प्राजक्ता गोरडे यांना कारमधून ओढून बाहेर काढत चेहरा, पोट, छाती व पाठीवर मारहाण करत अश्लील स्पर्श करत लज्जा उत्पन्न होईल अशी वागणूक दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.या प्रकारामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक ग्रामस्थांनी हस्तक्षेप करून वातावरण निवळवले. नंतरप्राजक्ता गोरडे व त्यांचे भाऊ उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, टाकळी हाजी येथे गेले व नंतर टाकळी हाजी पोलिस दूरक्षेत्रात तक्रार दाखल केली. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात विविध कलमाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक फौजदार साबळे यांनी गुन्हा दाखल केला असून, पोलीस हवालदार आगलावे तपास करत आहेत.सदरची घटना ही सार्वजनिक रस्त्यावर महिलेसह तिच्या भावावर करण्यात आलेल्या हल्ल्याशी संबंधित असून, आरोपींविरोधात कायदेशीर कारवाईची मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे. पोलिस प्रशासनाने या प्रकरणी तत्काळ कारवाई करावी अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.